।। श्री स्वामी समर्थ ।।

श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग (दिंडोरी प्रणीत)®

# श्री मल्हारी सप्तशती


परमपूज्य गुरुमाऊली विरचीत प्राकृत भावार्थ टिका (सेवा कुलदैवताची)

मराठी



मुनींना सप्त कोटीणां वरदं भक्त वत्सलां । दुष्ट मर्दन देवेश वंदे हं म्हालसापती ।।

Scanned by CamScanner




Scanned by CamScanner

॥ श्रीस्वामीसमर्थ ॥

श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग

(दिंडोरी प्रणीत)

परमपूज्य गुरुमाऊली विरचित प्राकृत भावार्थ टीका

# श्री मल्हारी सप्तशती

(सेवा कुलदैवताची)


**गुरुमाऊली परमपूज्य आण्णासाहेब मोरे**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ

श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक.




Scanned by CamScanner

# - अनुक्रमणिका -


| | | |
|---|---|---|
| १) | श्री स्वामी स्तवन | ६ |
| २) | मल्हारी कवच | ९ |
| ३) | मल्हारी हृदयस्तोत्र | १४ |
| ४) | मल्हारी अष्टक | १६ |
| ५) | मल्हारी मार्तंडाचा मंत्रजप | १७ |
| ६) | मल्हारी सप्तशती अध्याय - १ ते १४ | १८ ते ७७ |
| ७) | क्षमाप्रार्थना स्तोत्र | ७८ |
| ८) | खंडेरायाची आरती | ७९ |
| ९) | खंडेरायाची माहिती | ८० |
| १०) | विशेष प्रसंगी करावयाची प्रार्थना (तळी भरणे) | ८६ |
| ११) | मल्हारी स्तोत्र शतक | ८८ |




Scanned by CamScanner

# श्री स्वामी स्तवन

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः। श्री गुरुभ्यो नमः। श्री कुलदेवतायै नमः। श्री अक्कलकोटनिवासी-पूर्णदत्तावतार-दिगंबर-यतिवर्य स्वामिराजाय नमः।।

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं। द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम्।। एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं। भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि।।

ॐ रक्तांग, रक्तवर्ण, पद्मनेत्र, सुहास्यवदनं, कंथा - टोपी - च - माला दण्डकमण्डलुधर, कटयांकर, रक्षक, त्रैगुण्यरहित त्रैलोक्यपालक, विश्वनायक, भक्तवत्सल, कलियुगे, श्रीस्वामी समर्थावतारधारक पाहि माम्। पाहि माम्। पाहि माम्।।.

आता करू या प्रार्थना । जयजयाजी अघहरणा ।
परात्परा कैवल्यसदना । ब्रह्मानंदा यतिवर्या ।।
जयजयाजी पुराणपुरुषा । लोकपाला सर्वेशा ।
अनंत ब्रह्मांडाधीशा । वेदवंद्या जद्गगुरू ।।
सुखधामनिवासिया । सर्वसाक्षी करुणालया ।
भक्तजन ताराया । अनंतरूपें नटलासी ।।
तूं अग्नी तूं पवन । तूं आकाश तूं जीवन ।
तूंची वसुंधरा पूर्ण । चंद्र सूर्य तूंच पैं ।।
तूं विष्णु आणि शंकर । तूं विधाता तूं इंद्र ।
अष्टदिक्पालादि समग्र । तूंच रूपें नटलासी ।।



Scanned by CamScanner

कर्ता आणि करविता । तूंच हवी आणि होता।
दाता आणि देवविता । तूंच समर्था निश्चयें ।।
जंगम आणि स्थिर । तूंच व्यापिलें समग्र ।
तुजलागीं आदिमध्याग्र । कोठें नसे पाहतां ।।
असोनिया निर्गुण । रूपें नटलासी सगुण ।
ज्ञाता आणि ज्ञान । तूंच एक विश्वेशा ।।
वेदांचाही तर्क चांचरे । शास्त्रांतेंही नावरे ।
विष्णु शंकर एकसरें । कुंठित झाले सर्वही ।।
मी केवळ अल्पमती । करूं केवीं आपुली स्तुती ।
सहस्रमुखही निश्चिती । शिणला ख्याती वर्णितां ।।
दृढ ठेविला चरणीं माथा । रक्षावें मजसी समर्था ।
कृपाकटाक्षें दीनानाथा । दासाकडे पाहावें ।।
आतां इतुकीं प्रार्थना । आणावी जी आपुल्या मना ।
कृपासमुद्रीं या मीना । आश्रय देईजे सदैव ।।
पाप ताप आणि दैन्य । सर्व जावो निरसोन ।
इहलोकीं सौख्य देवोन । परलोकसाधन करवावें ।।
दुस्तर हा भवसागर । याचे पावावया पैलतीर ।
त्वन्नाम तरणी साचार । प्राप्त होवो मजला ते ।।
आशा मनीषा तृष्णा । कल्पना आणि वासना ।
भ्रांती भुली नाना । न बाधोत तुझ्या कृपें ।।
किती वर्णूं आपुले गुण । द्यावें मज सुख साधन ।



Scanned by CamScanner

अज्ञान तिमिर निरसोन । ज्ञानार्क हृदयीं प्रगटो पैं ।।
शांती मनीं सदा वसो । वृथाभिमान नसो ।
सदा समाधान वसो । तुझ्या कृपेनें अंतरीं ।।
भवदु:खे हें निरसो । तुझ्या भजनीं चित्त वसो ।
वृथा विषयांची नसो । वासना या मनातें ।।
सदा साधु-समागम । तुझें भजन उत्तम ।
तेणें होवो हा सुगम । दुर्गम जो भवपंथ ।।
व्यवहारीं वर्ततां । न पडो भ्रांती चित्ता ।
अंगी न यावी असत्यता । सत्यें विजयी सर्वदा ।।
आप्तवर्गाचें पोषण । न्यायमार्गावलंबन ।
इतुकें द्यावे वरदान । कृपा करूनि समर्था ।।
असोनियां संसारात । प्राशीन तव नामामृत ।
प्रपंच आणि परमार्थ । तेणें सुगम मजलागीं ।।
कर्ता आणि करविता । तूंची एक स्वामिनाथा ।
माझिया ठाई वार्ता । मी पणाची नसेची ।।

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुगुरुर्देवो महेश्वर: ।
गुरु: साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नम:।।

एक माळ 'श्री स्वामी समर्थ' मंत्राचा जप

Scanned by CamScanner

# श्रीमल्हारीकवच

## अथ कवच

ध्यान

ध्यायेन्मल्लारिदेवं कनकगिरिनिभं म्हाळसा भूषिताङ्कम् ।
श्वेताश्वं खड्गहस्तं विबुधबुधगणै: सेव्यमानं कृतार्थै: ।।
युक्तांघ्रिं दैत्यमूर्ध्नि डमरुविलसितं नैशचूर्णाभिरामम् ।
नित्यं भक्तेषु तुष्टं स्वगणपरिवृतं नित्येमोंकाररूपम् ।

प्रथम करावे गणेशनमन । सर्व सिद्धींचे साधन ।
विघ्ने जाती सर्व पळून । यश कार्यात लाभते ।।१।।
शिव म्हणे पार्वतीस । ऐक देवी मल्हारीकवच ।
हे गुह्याहुनि अतिगुह्य । अज्ञात आजवरी सर्वांना ।।२।।
पार्वती विचारी शंकराला । सांगा कवच हे हो मजला ।
काय फळ मिळे जपणाराला । कैसे करावे साधन ।।३।।
कैसे याचे विधिविधान । कोणत्या प्रकारे अर्चन ।
कैसे होतसे रक्षण । पठणकरिता कवचाचे ।।४।।
पार्वतीस सांगे कैलासपती । ऐक प्रिये सावध चित्ती ।
कैसी विधी विधान रीति। कवचसाधना करावया ।।५।।
शिखास्थानी प्रणवाक्षर । ब्रह्मउद्गिथ मस्तकावर
मूर्धस्थानी ओंकार । ललाटी महेश्वरे रक्षावे ।।६।।



Scanned by CamScanner

दोन्ही नेत्री मणिहन्त्यास। भ्रूमध्ये भुवनेश्वरास।
नासिकेवरी सुदेवेशास। मुखी ओंकारे रक्षावे ॥७॥
शिव न्यासा कंठावरी। पार्वतीस स्कंधावरी।
खड्गराज बाहुवरी। हातांवरी रक्षणे त्रिपुरान्तक ॥८॥
शंकर न्यासा अंगुलीवरी। चंद्रशेखर हृदयावरी।
पिनाकीला जठरावरी। धूर्जटी नाभिवरी रक्षो ॥९॥
महादेवा, उदरासी रक्षी। शैलजापति, कटीस रक्षी।
त्र्यंबका माझ्या मांड्यांस रक्षी। गुडघे माझे कृत्तिधारका ॥१०॥
दोन्ही जांघा ईश्वराने। घोटे म्हाळसापतीने।
पायांचे रक्षण ईशाने। सदासर्वदा करावे ॥११॥
जोडोनि दोन्ही हात। भक्तिभरे सावधचित्त।
प्रार्थना मल्हारीदेवास। मनोभावे करावी ॥१२॥
ऐसे कवच हे मल्हारी। सर्वरक्षक सर्वतोपरी।
नित्य नेमे जपता जरी। इहपरत्र कल्याण होते ॥१३॥
ऐशा या कवचाने। रक्षण व्हावे त्वरेने।
म्हणोनि हृदयी प्रेमाने। मल्हारीदेव चिंतावा ॥१४॥
करिता मल्हारीचे चिंतन। आधिव्याधी जाती पळून।
जवळी येती कदापि न। भूत प्रेत पिशाच्च ॥१५॥
कुष्ठ गळू दद्रुरोग। इत्यादी महाबलिष्ठ रोग।
नष्ट होती महारोग। चिंतिता मार्तंडभैरवासी ॥१६॥
प्रतिचार तीन दिवसांचा। ताप उचकी नाशाचा।



Scanned by CamScanner

उपाय एक आहे साचा। चिंतन मार्तंडभैरवाचे ॥१७॥
मस्तकशूळ निरसोनी जाई। रणद्युतविवादे विजय होई।
सर्वकार्य सफल होई। मार्तंडभैरव चिंतिता ॥१८॥
घनघोर वनामध्ये। व्याघ्र-सिंहादी श्वापदे।
त्यांची बाधा कधी न होते। चिंतिता मार्तंडभैरवाला ॥१९॥
सर्व कार्ये सिद्धीस जाती। सर्व बाधा नष्ट होती।
सर्व मनोरथ सफलपूर्ती। चिंतिता मार्तंडभैरवाला ॥२०॥
पुत्रार्थियासी पुत्रप्राप्ती। धनार्थियासी धनप्राप्ती।
विद्यार्थ्याला विद्याप्राप्ती। होते मल्हारीकृपेने ॥२१॥
अश्वरथ पताका मिळते। भव्य सुंदर गृह लाभते।
दास-दासी राज्य मिळते। करिता स्मरण मल्हारीचे ॥२२॥
आयुष्य-आरोग्य-यशप्राप्ती। काव्यस्फूर्ति प्रतिभाशक्ती।
संस्कृत प्राकृत भाषाप्राप्ती। मिळे मल्हारीकृपेने। ॥२३॥
चंदन आहे शीतल। त्याहुनि चंद्रमा अतिशीतल।
याहीपेक्षा श्रेष्ठ शीतल। मल्हारी मार्तंड देवराणा ॥२४॥
मल्हारीदेवा, जयजयकार। म्हाळसाकान्ता, जयजयकार।
मेंगनाथ महिपति जयजयकार।मैराळ खड्गराजा जयजयकार॥२५॥
खंडेराया, जयजयकार। जय राजा, तव जयजयकार।
प्रेमपूरस्वामी जयजयकार। येळकोट खंडेराव ॥२६॥
ऐसे मल्हारीचे करिता चिंतन। सर्व संकटे जाती पळोन।
सकल सुखे-समाधान। लाभे मल्हारी-भक्तांना ॥२७॥



Scanned by CamScanner

राजद्वारी मार्गावरी। घोर संग्रामी असता जरी।
अग्नि चोर भयंकरी। कशाचीही बाधा न होतसे ||२८||
नाना सिद्धी प्राप्त होती। शांति, सुखे पूर्ण मिळती।
मनोकामना सफल होती। करिता चिंतन मल्हारीचे ||२९||
या मार्तंडभैरवाचे चिंतन। सर्व सिद्धींचे साधन।
आनंदरूप मल्हारी भगवान। त्यासी भजितो मी सर्वदा ||३०||
भजनपूजन मल्हारीचे। करिता पठण कवचाचे।
मंत्र स्तोत्र जप नित्य साचे। सिद्धी मिळती सहजचि ||३१||
पार्वती विचारी शंकराला। विनंती माझी तुम्हाला।
संशय माझ्या मनात आला। त्याचे निरसन करावे ||३२||
नाव मल्हारीदेवाचे। तुमचे स्वरूप दिसते साचे।
भक्तांनी काय मानावयाचे। भिन्न अथवा एक देव? ||३३||
शिव बोले पार्वतीला। प्रश्न तुवा उत्तम केला।
सामान्य भक्तांच्या मनाला। हीच शंका येईल ||३४||
मी आहे विश्वाकार। स्वरूप माझे चराचर।
मनीं ठेवा हा विचार। मजहुनि काही भिन्न नसे ||३५||
मल्हारी आणि शंकर। नाही निराळे खरोखर
मल्हारी माझा अंशावतार। दृढ श्रद्धा ही असावी ||३६||
भजन-पूजन मल्हारीचे। जप व पठण कवचाचे।
तेच आहे शिवशंकराचे। शिवमल्हारी एक असे ||३७||
हे मल्हारीकवच संजीवनी। ऐश्वर्याची असे खाणी।



Scanned by CamScanner

आयुरारोग्य चिंतामणी। हृदयीं धरा सदाचा ॥३८॥
त्रिकाल करिता कवचपठण। कृपा होते न लागता क्षण।
चारी पुरुषार्थ तत्क्षण। लाभती मल्हारी-भक्तांना ॥३९॥
मनीं आणावे ते ते होते। असाध्य सारे साध्य ठरते।
मनोवांछित घडोनि येते। मल्हारीकवच पठण करिता ॥४०॥
दहावेळा प्रतिदिवस। ऐसे पठण करा एक मास।
जितेंद्रिय, उपवास। भूमीवरी शयन करा ॥४१॥
स्वप्नात येईल मल्हारी। वर देईल खरोखरी।
शतपाठ करता साचारी। शापमुक्ती लाभेल ॥४२॥
नित्य सहस्रावर्तन। करता अहोरात्र जपन।
प्रत्यक्ष मल्हारी भगवान। दर्शन देईल निजभक्ता ॥४३॥
मल्हारीराया, तुझे नाम। सर्व सुखांचे असे धाम।
अमर्याद तो कल्पद्रुम। भक्तोद्धारा प्रगट झाला ॥४४॥
तू तीर्थ प्रयाग केवळ। सौख्यदाता अतिनिर्मळ।
महिपति तू कृपाळ। आलो शरण मी तुझ्या चरणा ॥४५॥
भजन-पूजन जे तुझे करिती। नित्य कवचावर्तने होती
त्यांच्या सुखा नको गणती। हीच विनवणी सेवेकरीची॥४६॥

इति श्रीब्रह्मांडपुराणे क्षेत्रखंडे मल्लारिमाहात्म्ये
श्री गुरुमाऊलीविरचित प्राकृत मल्लारीकवचं॥



Scanned by CamScanner

|| श्री स्वामी समर्थ ||

# श्री मल्हारी हृदय स्तोत्र

श्री गणेशाय नमः । ॐ अस्य श्री मल्लारि - हृदय मंत्रस्य । ब्रह्मा विष्णु महेश्वरा ऋषयः ।। अनुष्टुभ् छंदः । श्रीगंगाम्हाळसायुक्त मल्लारी देवता ।। भुर्भुवः स्वः इति बीजम् ।। तत्सवितुर्वरेण्यं इति शक्तिः ।। भर्गो देवस्य धीमहि इति कीलकं ।। धियो यो नः प्रचोदयादित्यस्थम् ।। श्री मार्तंड-भैरव प्रीत्यर्थ ।। मम समस्त पुरुषार्थ सिध्यर्थे जपे विनियोगः ।।

पूर्व श्वेतांबरं देवं आग्नेयां रुद्र भैरवं। दक्षिणे चंडरूपाय नैर्ऋत्यां क्रोधभैरवं ।। पश्चिमे उन्नतग्रीवं वायव्यां कालभैरवं ।। उत्तरे सिद्धि सिध्दान्तं ईशान्या शिवकर्पूरम् ।। ऊर्ध्वे कालविरूपाय अंबरे मल्ल हारिणीं ।। अंतरिक्षं सदानंदं येळकोटि स्वरूपिणं ।। एवं एकादशं देवं रक्षे त्रैलोक्य सर्वदा । विजयी सर्व कामार्थ क्षेत्रपाल महिपते। भ्रुवोर्मध्येतु ॐकारं द्विदले सहस्र भावनः । नेत्रे त्रिपुरांतकं देवं नासिके कामहारक ।। मुखे मुमुक्षुनाथायं, कंठं कर्म कलामृतं ।। हृदयं हरिलिंगाय स्कंधे कर्म हरिप्रियं ।। पृष्ठे प्रीलय रुद्राय उदरे उदयार्कजम् ।। मध्यं रक्षतु कायार्थी नाभी नारद जायते ।। गुह्यं गुरुपथान्माय जंघे जीव प्रदोक्तु ।। जानुमंडल जानाथ पद प्रासाद प्राप्तये । अंगुष्ठे सर्व तीर्थानि, सर्वांगे परमेश्वरः ।। एवं अंगेषु दिव्यस्य मार्तंड स्वरूपिणं प्रथमं काशिनाथाय ।। द्वितीय पंचलिंगयो । तृतीयं प्रेमलिंगाय ।

चतुर्थे देवरूपिणीम्। पंचमं पंचप्राणाय। षष्ठं षड्भुज क्षेमकम्।। सप्तकं सपाकं सिद्धि। अष्टमं अंबिकाप्रियम्।। नवमं नागनाथं च। दशमं शोषहारकं। एकादशं महारुद्रं। द्वादशं ज्योतिः लिंगयोः।। त्रयोदशं त्रियोर्गीच। चतुर्दशं भुवनत्रये।। पंचदशं मंडलं पूर्व। षोडशं च समाधिने।। सप्तदशं गुह्यरूपं। अष्टादशं च अब्जकम्।। नवदशं नैसर्गिकं देवी। तन्नो देवी प्रसन्नता।। एकोनविंशति नामानि विश्वंभर स्वरूपयो। ज्ञानसिद्धि भवेत्प्राप्ति। एकादशं जपं जले।। स्मशाने दशपाठ च सप्तवार. पठेन्नरः। सर्वषगो भवेत् हानिः संग्रामे विजयी भवेत्।। अश्वत्थं बिल्वं मांदारं चंदनं धातुपंचकं। शामा सुगंधि कादंबा नववारं पठेत्सुखं। मंत्रसिद्धिं नवरात्रेण। अष्टरात्रं च देवतम्। पंचरात्रे जनवश्यं, त्रिरात्रं त्रिसमाहितः।। द्विरात्रं व्याघ्र सर्पाणाम् मोहनं मंत्र मालिका। एवं हृदयं मार्तंड पाठं शुभकुलं जये।। मार्तंड क्षेत्र मान्यो वा कर्म धर्म सुखोवहं।। एवं विशंति ते कार्य। मार्तंड रूप दर्शिनम्।। भावार्थ तारको देव परब्रह्म स्वरूपिणीम्।।

इति श्रुति - स्मृति योगार्णव श्री मार्तंड अवतार प्रोक्तं ईश्वर - पार्वति संवादे मल्लारी हृदय स्तोत्र संपूर्णम्।।

Scanned by CamScanner

|| श्री स्वामी समर्थ ||

# मल्हारी अष्टक

त्रैलोकी मणि-मल दैत्य सकळा अजिंक्य झाले मही।
तेही ब्राह्मण होम ध्वजे विध्वंसिले सर्वही।
आला ते समयी सदाशिव स्वये सोडोनि ब्रह्मांड हो।
तो हा पाहु चला कृपाजल निधी मल्हारी म्हाळसाकान्त हो ||१||
संगे घेवोनि सप्त कोटी गण हो आला असे भूतला।
खंडेराय म्हणोनिया प्रगटला अद्भुत त्याची लीला।
संबोधे मणीमल्ल मर्दोनिया केला पहा डंच हो।
तो हा पाहु चला कृपाजल निधी मल्हारी म्हाळसाकान्त हो ||२||
घेता हा अवतार दुष्ट दमुनि सद्भक्त रक्षियले।
गायी ब्राह्मण होमहवने हे धर्म संस्थापिले।
कीर्ति गाती भृगूमुनी जन सदा सत्कीर्ती उदंड हो।
तो हा पाहु चला कृपाजल निधी मल्हारी म्हाळसाकान्त हो ||३||
संतोषे जनसर्वदा उधळीती भंडारा देवावरी।
झालासे विजयी म्हणोनी दिवट्या लावोनिया प्रेमरी।
केला वास शिवे तळ्या उचलिल्या निर्दाळीले दैत्य हो।
तो हा पाहु चला कृपाजल निधी मल्हारी म्हाळसाकान्त हो ||४||
प्रारंभी स्थळ प्रेमरी तदुपरी पालीस आला असे
नळदूर्ग तिसरे विशेष चौथे जेजुरीचे असे।
ऐशीया जव स्थानका विरती पृथ्वीत नवखंड हो।
तो हा पाहु चला कृपाजल निधी मल्हारी म्हाळसाकान्त हो ||५||
शोभे दिव्य कला सुरंभ पिवळा। आपादपर्यंत हो।

झाले लोचन तृप्त पाहता मुखशशी। तो म्हाळसाकान्त हो।
अश्वारूढ करी स्वयंत्र झळके। शस्त्र अखंड हो।
तो हा पाहु चला कृपाजल निधी मल्हारी म्हाळसाकान्त हो ।।६।।
ऐशीया कुलदैवता नमुनिया। जो नित्य भावे भजे।
त्याला काय उणे। नमाघत सदा अद्याप्तही देई जे।
दाता देईल भक्ति मुक्ति समान। वारोनि पाषांड हो।
तो हा पाहु चला कृपाजल निधी मल्हारी म्हाळसाकान्त हो ।।७।।
मल्हारी अष्टक जो पढेल। अथवा ऐकेल अत्यादरे।
त्याचेही कळीकाळ दास्य। करोनिया राहील हे तो खरे।
तेथे शाश्वत रंगला। निजसुखे वारोनिया डंब हो।
तो हा पाहु चला कृपा जलनिधी मल्हारी म्हाळसाकान्त हो ।।८।।

इति श्रीब्रह्मांडपुराणे क्षेत्रखंडे मल्लारिमाहात्म्ये
श्री गुरुमाऊली विरचित मल्हारी अष्टक संपूर्णम्

## मल्हारी मार्तंडाचा मंत्रजप

हा मंत्र ४७ वर्णांचा असून तो अत्यंत प्रभावी, लवकर फळ देणारा आहे. या मंत्राचा नित्य अकरावेळा जप करावा किंवा अकरा माळा जप करावा. मंत्रजप मनात करावा. उच्चार स्पष्ट, शुद्ध असावा.

**मंत्र**

ॐ ऱ्हीं भ्रूं त्रूं सूं ऱ्हूं ध्रूं प्रियाणानंद गंगामहालसाभ्यां
सहिताय श्रीमार्तंडभैरवरूपाय श्रीमल्लारये नमः।
भ्ऱ्ह्यूं ध्रूं ऱ्हूं सूं त्रूं भ्रूं ऱ्हीं।।

॥ श्री स्वामी समर्थ ॥

# ॥ श्री मल्हारी सप्तशती ॥

अथ ध्यानम् - ध्यायेन्मार्तंडरूपं अचल-चल-विभू कोटि सूर्य प्रकाशं। आनंद विश्ववंद्यं सकल जनकरं कर्मधर्मादिनाथं।अश्वंबोधावरूढंपरमविरलंश्रीकोटिकंदर्पदर्पम्। श्रीमन्मल्लारिराजं विजय जयकरं म्हाळसाकान्त सिद्धं ॥

## अध्याय पहिला

श्री गणेशाय नमः। श्री कुलदेवतायै नमः।

अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराजाय नमः।

श्री मल्हारी मार्तंडाय नमः।

जय जयाजी गणनाथा। तुझिया चरणी ठेवितो माथा।
देव मल्हारीची कथा। तुम्ही वदवावी आता ॥१॥
नमू ती आदिशक्ती। माता विश्वाची सरस्वती।
सकळ काव्यउत्पती। तिचिया चरणाशी ॥२॥
करू नमन स्वामी समर्थ। सकळ जनांचा गुरुनाथ।
तुम्हीच कर्ता करविता। या मल्हारी सप्तशतीचे ॥३॥
करितो मी नमस्कार। त्या माता-पितयांचे उपकार।
मज असती थोर। दाखविले जग तयांनी ॥४॥
एके दिवशी दिंडोरी। गुरुमाऊली वसती दरबारी।
पुसती तयांशी सेवेकरी। सेवा आपुल्या कुलदैवताची ॥५॥
दादांनी दाखवली कुलदेवता। आपण सांगावे कुलदैवत।
सेवा कशी करावी आता। सेवेकऱ्यांच्या कल्याणासाठी ॥६॥



Scanned by CamScanner

श्री गुरुमाऊली उवाचः ।।७।।

आईसाहेब पार्वतीमाता । असे सर्वांच्या कुलदेवता ।
शिवशंकर असे पिता । मल्हारी मार्तंड स्वरूपात ।।८।।
तयाची करिता सेवा । तो तत्काळ हो पावता ।
आशीर्वाद तयाचे मिळता । सुख लाभे सेवेकऱ्यास ।।९।।
थोर ब्रह्मांड पुराणात । मल्हारी कथा क्षेत्रखंडात ।
सांगितली जी नैमिष्यारण्यात । सनत्कुमार ऋषींनी ।।१०।।
तो अवतरला मल्हारी । या संसार सागरी ।
कळीकाळाच्या लहरी । तारावया सकल जना ।।११।।
धरिता श्रीमल्हारीचे चरण । भवबंधाचे होते निवारण ।
अतिदुस्तर व्याधि हरण । सकल स्वामी सेवेकऱ्याचे ।।१२।।
थोर तो चंद्रशेखर । धरीला मल्हारी अवतार ।
केला तयाने संहार । त्या मणी-मल्ल दैत्यांचा ।।१३।।
म्हाळसा महाकाली । स्वये प्रगटली शैलजा बाळी ।
ती विश्वमाता अवतरली । श्री मल्हारीसमवेत ।।१४।।
अवतार कथा तयांची । ऐकावी तुम्ही साची ।
पुरवील आस भक्ताची । श्री मल्हारी सप्तशती ।।१५।।
कोणे एके अवसरी । रम्य कैलास शिखरावरी ।
हिरेजडित मंदिरी । महादेव शंभू वसे ।।१६।।
आली तेथे भवानी । नमस्कारीला शूलपाणी ।
एकांती अर्धांगी बैसोनी । पुसती झाली शिवासी ।।१७।।



Scanned by CamScanner

पार्वती उवाचः ॥१८॥

देवा तुमचे नाना अवतार। तयासी नसे पार।
जो उद्धरील मानवा भवसागर। तयांचे माहात्म्य सांगावे ॥१९॥
करिता कोणते व्रत। सेविता करे पवित्र।
ऐसे कोणते तीर्थक्षेत्र। सांगावे मज प्राणप्रिया ॥२०॥

श्री शंभु उवाचः ॥२१॥

श्री देवी अंबिके वराननें। तुज सांगेन वचने।
भक्ती-मुक्तीची कारणे। मल्हारी अवतार माझा ॥२२॥
पुर्वी कृतयुग माझारी। कवणे एके अवसरी।
पिडिले ऋषिश्वर भारी। दैत्य त्रासे करोनिया ॥२३॥
ऋषिनामे सनत्कुमार। जो प्रत्यक्ष ब्रह्मांचा कुमार।
दरिद्रे पीडिले जे ऋषिवर। तयाप्रती सांगतसे ॥२४॥

सनत्कुमार उवाचः ॥२५॥

सप्त धर्म पुत्र तपाशी। आले मणिचूर पर्वताशी।
अतितीव्र तपे मानसी। करिते झाले आश्रमाशी ॥२६॥
त्या आश्रमाचे महिमान। श्वापदे वैर सोडून।
करिती क्रीडा एकत्र। स्वानंदपणे नांदताती ॥२७॥
तया वनाच्या ठायी। मयूर नाचती पाही।
कोकिळा आळविती लवलाही। बक, शुक रुंजी करिताती ॥२८॥
ऐसा तो आश्रम मनोहर। वर चंपकलताचा बडिवार।
केळी, नारळ, फणस सुंदर। शोभतसे तया अंगणी ॥२९॥
आश्रमातील सरोवरे। जले परिपूर्ण मनोहरे।

कमळे फुलली सुंदर। मंद मंद सुवासित ||३०||
मल्ल दैत्य तेथे पर्वतावरी। आला एके अवसरी।
खंड्:ग झळके तयांचे करी। छेदीतसे वायुते ||३१||
अश्वरथसहीत। राक्षस विक्राळ परिवारित।
शस्त्र व्याकुळ करीत। सकळ ऋषिमंडळीना ||३२||
ऋषीचे आश्रम विध्वंसिले। अनेक वृक्ष उपटिले।
दैत्यांनी अत्याचार केले। अति ऋषी परिवारावर ||३३||
अग्नि होमाची यज्ञकुंडे। आश्रमातील उदकपात्रे।
अनेक प्रकारची यंत्रे। मळमूत्रे अपवित्र केले ||३४||
पुष्पाची वृक्षे उन्माळीले। घरे दारे विध्वंसिले।
मद्यपान करीत आले। उद्ध्वस्त केले आश्रमास तये ||३५||
मग ते आश्रमाची कळा। भग्न झाली तये वेळा।
जैसा धरणीकंप जाहला। म्लान वदनी सृष्टी सारी ||३६||
ऋषेश्वरासी घोर पीडता। कंठी पाश असे बांधिता।
वापी सरोवर मध्ये बुडविता। दैत्य ते महाबाहो ||३७||
तया ऋषींच्या कान्ता। त्यासी व्याकुळ करिता।
नाशिल्या त्या पतिव्रता। मल्लदैत्ये तये वेळी ||३८||
ऋषी बोलती मनी। आता आश्रम सोडुनी।
कोठे जावे आम्ही। दैत्यांच्या पीडे करुनी ||३९||
पूर्वी आम्ही पाप केले। तेची फळे प्राप्त झाले।
दैत्ये आम्हा गांजिले। आम्ही अनाथ जाहलो ||४०||
आता कोणासी सांगणे। कोण्या राजाशी मागणे।



Scanned by CamScanner

देवराजही जिंको नसे। या मल्ल दैत्यराजासी ||४१||
हा वृत्तान्त सांगो इंद्रासी। की सांगावे ब्रह्मदेवासी।
का जावे वैकुंठाशी। पुढे जावे कैलासगिरी ||४२||
पीडा सांगू महादेवासी। तोच हारील दु:खराशी।
ऐसे विचार करिते मनाशी। दैत्यपीडित ऋषिवर ||४३||
आणिका पर्वता जाणे। तेथे कुटुंबे अग्निहोत्रे ठेवणे।
मग आम्हाला जाणे। अन्यत्र साह्यासी ||४४||
हे मल्हारीचे चरित्र। ब्रह्मांड पुराणी असे विचित्र।
ते करुनी पवित्र। गुरुमाऊली कथन करी ||४५||

इति श्री गुरुमाऊली विरचित, प्राकृत भावार्थ टीका
ब्रह्मांड पुराणे, क्षेत्रखंडे मल्हारी सप्तशती प्रथमो अध्याय
श्री कुलदैवत खंडेराव महाराज चरणार्पणमस्तु ||
|| ओवी ४५ ||

## अध्याय दुसरा

श्री गणेशाय नम:
सनत्कुमार उवाच ||१||

कुटुंब सारे अग्निहोत्रासी। ऋषी ठेवुनी पर्वताशी।
गेले सारे अमरावतीसी। इंद्रराजास सांगण्या ||२||
रत्ने झळकती सिंहासनी। इंद्र बैसला आसनी।
अनेक अप्सरा येऊनी। करिती तयाची सेवा ||३||
तेथे सेवितसे अग्नी। यमपाश सोडुनी।



Scanned by CamScanner

कुबेर नवनिधी घेऊनी। सेवा करीतसे शक्राची ॥४॥
सूर्य शांत मूर्तीसी। चंद्र सर्व भावेसी।
बृहस्पती करी स्तवनाशी। त्या इंद्र दरबारी ॥५॥
ऋषी इंद्रनगरी प्रवेशले। देवसभा देखते झाले।
देवता सारे तेथे विराजले। अमरावती नगरीत ॥६॥
ऐसा तो देवराणा। देखोनिया ऋषिगणा।
स्वतः उठोनिया सिंहासना। तयांसी नमस्कार करिता झाला ॥७॥

इंद्र उवाचः ॥८॥

दुर्लभ तुमचे चरण। करीतसे मज पावन।
तुम्ही कार्य घेऊनी कवन। सांगावे मज ऋषिराया ॥९॥

ऋषी उवाचः ॥१०॥

तुझे अभय आम्हासी। म्हणुनी मणिचूर पर्वतासी।
आम्ही करीत होतो तपासी। आला तेथे मल्लदैत्य ॥११॥
घेऊनी दैत्य परिवाराला। आश्रमी येता झाला।
आम्हासी पीडू लागला। तपभंग करावया ॥१२॥
आम्ही जीवमात्र धरून। कुटुंबे आणिके पर्वते ठेवून।
आले तुज शरण। तू सर्व जाणसी ॥१३॥
देवराया, इतुके करणे। दैत्य मणी-मल्ला वध करणे।
आम्हासी आश्रमी स्थापणे। तुम्ही निर्भय करुनिया ॥१४॥

शक्र उवाचः ॥१५॥

त्या दैत्ये ब्रह्मासी आराधिले। एके अंगुष्ठे तप केले।
धुम्रपाना सहीत जपिले। तयाने झाला अमर तो ॥१६॥



Scanned by CamScanner

त्या तपोबळे उन्मन्त। झाला तो दैत्य।
कोणी जिंकू न शकत। त्या महादुष्ट दैत्यांना ||१७||
तुम्ही वैकुंठासी जावे। महाविष्णूस वृत्तान्त सांगावे।
आमचे क्लेश वदवावे। तोच पालनकर्ता सृष्टीचा ||१८||
धर्मपुत्र निघाले तेथून। हृदयी श्रीविष्णुचरणस्मरून।
पाहण्या वैकुंठभुवन। कृपादृष्टी तयांची मिळण्या ||१९||
पोहोचले वैकुंठ भुवनी। सुंदर मंदिर पाहुनी।
भक्ती जडली चरणी। वैकुंठपती तेथे वसे ||२०||
देखिला ऋषींनी कमलनयन। केला पीतांबर परिधान।
रत्नजडित सिंहासन। शोभतसे मेघ सावळा ||२१||
केयुर कनक किंकिणी शोभत। कंठी कौस्तुभ झळकीत।
कर्णी कुंडले मिरवीत। हृदयी वैजयंती शोभत ||२२||
गरुड सेवा करी। हस्ती, गदा, पद्म, शंख, चक्र शोभी।
पद्मासनी बैसले श्रीहरी। वदन सुहास्य शोभे ||२३||
सौंदर्याचा निधी वोतीला। रत्नखचित मुकुट शोभला।
सुवर्णतेजे सूर्य भासला। श्रीहरी आसनी वसे ||२४||
प्रिय भक्त ऋषीनारदादिक। कपीलमुनी सिद्ध साधक।
जवळी ते सनकादिक। भक्तिभावे शोभतात ||२५||
धर्मपुत्र ते पाहोनी आनंदले। नेत्र तयाचे जळी भरले।
नमस्कारुनी उभे ठाकले। श्रीविष्णूची स्तुती करु लागले ||२६||

ऋषी उवाचः ||२७||

जयजयाजी पुराणपुरुषा। निरामया निराभासा।



Scanned by CamScanner

नित्यानंदा हृषीकेशा। परमानंदा लक्ष्मीपती ॥२८॥
लक्ष्मीसहीत राजहंसा। जगदान्मया जगज्जीवना ॥२९॥
ऐसी स्तुती ऐकोनी। संतोषला तो चक्रपाणी।
मेघगंभीर वचनी। पुसता झाला ऋषींसी ॥३०॥

श्री भगवान उवाच: ॥३१॥

प्रसन्न झालो तुम्हासी। का येणे केले वैकुंठासी।
सांगावे तुम्ही मजसी। धर्मपुत्र ऋषिवरांनो ॥३२॥
तुम्हाते कोणी कष्टविले। कवणे पापी भेडसाविले।
दुर्मदे तपभंग केले। चित्त शोभविले तुमचे ॥३३॥
ऐकोनी महाविष्णूंची वचने। संतोषली धर्मपुत्रांची मने।
नमस्कार करुनी चरणे। सांगते झाले तयासी ॥३४॥

ऋषी उवाच: ॥३५॥

मणिचूर पर्वतासी। आम्ही वसता तपासी।
मणी-मल्ल दैत्ये पीडिले आम्हांसी।
आमुचे आश्रमासी नासविले ॥३६॥
अमरावतीचा राणा। तो मणी-मल्ले जिंकिला।
पीडिले आम्हा ऋषिजना। हे तुम्ही सर्व जाणता ॥३७॥

श्रीविष्णू उवाच: ॥३८॥

मणी-मल्ल दैत्य माजले। तपे ब्रह्मास आराधिले।
अमर ते जाहले। कोणी जिंकू न शके तयांशी ॥३९॥
ते न हार मानती। एका त्र्यंबकावाचुनी।
चला जाऊ शिवभुवनी। तुम्ही-आम्ही समवेत ॥४०॥



Scanned by CamScanner

वृत्तान्त सांगू महादेवास। विनंती करु तयास।
तोच वधील मणी-मल्ला सुरांस। चला ऋषिवर हो ||४१||
कैलास भुवनीची कथा। निवारील सर्व व्यथा।
साक्षी ठेवुनी समर्था। सांगतसे श्री गुरुमाऊली ||४२||

इति श्री गुरुमाऊली विरचित, प्राकृत भावार्थ टीका
ब्रह्मांड पुराणे, क्षेत्रखंडे मल्हारी सप्तशती द्वितीयोध्याय:
श्री कुलदैवत खंडेराव महाराज चरणार्पणमस्तु ||२||
||ओवी८७||

## ||अध्याय तिसरा||

श्री गणेशाय नम:

सनत्कुमार उवाच: ||१||

महाविष्णूसह वर्तमान। धर्मसुत ऋषिजन।
आकाशमार्गे करुनी गमन। निघाले दर्शना कैलासासी ||२||
तयांनी कैलासगिरी देखिला। सहस्र चंद्र किरणांचा भासला।
शुभ्र शूल देखिला। हिमगिरी शंभुनिवास ||३||
त्या कैलासगिरीवरी। पारिजात फुलले भारी।
चंद्रिकेसारखी निर्मळ परी। नाना सुगंध दरवळी ||४||
तेथे आम्रवृक्ष फुलले। कळी-पुष्पी परीमल फाकले।
जैसे चंदन पुरुषी चर्चिले। दाही दिशा घमघमीत ||५||
जेथे गंधर्व करिती गायन। किन्नरी नृत्य करून।
शिवशंकरास करण्या प्रसन्न। चौसष्ट कला जागविती ||६||



Scanned by CamScanner

रत्नखचित शिखरा माघारी। रूप पाहोनी नर-नारी।
कामधेनू तेथे रवंथ करी। शोभताती अतिसुंदर ॥७॥
हे मंदिर विश्वकर्म्याने निर्मिले। रत्नशिले असे उभारिले।
नाना रत्ने तेथे शोभले। रत्नखचित सुवर्ण मंदिर ॥८॥
कळस झळकती शिखरावरी। ध्वजपताका शोभती अंबरी।
कोटी सूर्य तेजापरी। सप्त प्रभावळी शोभती ॥९॥
प्रथम सोमकांताची वळी। दुसरी पद्मरागाची प्रभावळी।
तिसरी पुष्कराजाची केली। चौथी नीळकंठी शोभली ॥१०॥
पाचवी पोवळ्याची प्रभावळी। सहावी पाचूने बांधली।
सातवी हिऱ्याची निर्मिली। झळकली वीज अंबरी ॥११॥
मुक्ता कलाचा निर्मियेला। अमृतासारिख्या धवला।
स्फटिकासम सोज्वळा। भिंती शोभतात मनोहर ॥१२॥
ऐसा कैलास देखोनी। धर्मसुत आनंदी होऊनी।
श्रीविष्णु संतोष पाहोनी। तेथे जाते झाले ॥१३॥
ऋषींनी देखिले शिवभुवन। वर्णिता तयाचे महिमान।
लेखणी जाते आटून। मज पामराची काय कथा ॥१४॥
त्या सुंदर शिवभुवनी। नाना देवता बैसोनी।
अष्ट लोकपाल सेवा करुनी। वोलंगताती अखंडित ॥१५॥
सुरवर सकल इंद्रादिक। विद्याधर किन्नरे यक्षादिक।
कुबेरादी मुख्य नायक। सेविताती सेवकपणे ॥१६॥
अप्सरा समुदाये मिरवती। गीत-नृत्यांची माला दाविती।
शिवसभेते रिझविती। नृत्य-गायने करोनिया ॥१७॥



Scanned by CamScanner

ऐसे वर्णिले शिवभुवन। पुढे कथा अति गहन।
सावधान करुनी मन। श्रोते हो तुम्ही परिसावे ॥१८॥

इति श्री गुरुमाऊली विरचित, प्राकृत भावार्थ टीका
ब्रह्मांड पुराणे, क्षेत्रखंडे मल्हारी सप्तशती तृतीयोध्याय
श्री कुलदैवत खंडेराव महाराज चरणार्पणमस्तू ॥३॥

॥ ओवीं १०५ ॥

## ॥अध्याय चौथा॥

श्री गणेशाय नम:

सनत्कुमार उवाच: ॥१॥

देखोनी सभा रत्नजडित। नाना कलावंत सेवीत।
थोर विस्मय धर्मसुत। पावते झाले सर्वही ॥२॥
जे मणी मल्ले पीडिले। तापत्रयाग्नीने पोळले।
ते शिवसभा पाहुनी आनंदले। हृदयामाजी अत्यंत ॥३॥
सभेमाजी बैसला त्रिपुरारी। अर्धांगी शैलजासुंदरी।
देखिले धर्मपुत्र ऋषिश्वरी। पूर्वपुण्ये करोनिया ॥४॥
जैसे क्षराब्धीचे कल्लोळ। कामधेनुचे क्षीर धवल।
तैसे कर्पुरगौर निर्मळ। सोज्वळ दिसतसे ॥५॥
कमळदली पूजिला। अंगी चंदन चर्चिला।
वरी कर्पुर उधळीला। शोभतसे अतिभव्य शोभा ॥६॥
जयाची सुलक्षणयुक्त चरणतळे। दिसती आरक्त कोमले।
भक्ताच्या हृदयी जिंकिले। पाप-ताप-शोक हरे ॥७॥

ज्याचे पायी काळ वसत। सर्व वेष्ठी करोनी शोभत।
जो या विश्वाते पोशीत। सर्वेश्वर महादेव ||८||
मंचकी पद्मासन शोभत। व्यार्घचर्म असे परिधानित।
वरी भुजंग असे कवळीत। आनंदे शिवशंभूच्या ||९||
पानपात्र डमरू खड्ग। पिनाक बाण खट्वांग।
परशु अंकुश शृंग । त्रिशूळ हाती धरियेला ||१०||
ऐसे दशायुधे मनोहरे। प्रचंड दोर्दंडे धरिली करे।
कंकणे सर्पाची भयंकरे। दिसताती दृष्टीशी ||११||
पूर्वे सुंदर मुखकमळ। कंठ शोभे सुनील।
ग्राशी भक्तासाठी हलाहल। परमप्रीती करोनिया ||१२||
पश्चिमे मुखकमळ मिरवत। चंद्रासारखे निर्मळ दिसत।
कंदर्पाचे दहन करीत। शिव त्रिनेत्री शोभतसे ||१३||
उत्तर मुख शोभत। शूभ्रवर्ण गंडस्थळ मिरवीत।
विभूती त्रिपुंड विराजित। सुहास्यवदन शिवसुंदर ||१४||
मेघा सारिखे सुनिल। दृष्टी भयानक काळ।
सर्पा शोभत माळ। दक्षिण मुख दिसतसे ||१५||
पाचवे मुख व्यक्त-अव्यक्त। सगुण लक्षणेरहित।
तडीत्समुदायासारखी दिसत। असा पंचमुखी शिव ||१६||
शिवशंकराचे अर्धांगी। गौरीजा वसे वामांगी।
पंचमुखी शोभे सर्वांगी। मंगलमुर्ती महादेव ||१७||
जैसी गंगा समुद्री मिळाली। ते भवानी-शिवयोगाते पावली।



Scanned by CamScanner

सृष्टी सर्वही आनंदली। त्या परमेश्वराची चैतन्यकला ॥१८॥
पाहताच ती  गिरिजाभवानी। समवेत वसे शूलपाणी।
ऋषी संतोषले अंत:करणी। साष्टांग प्रणिपात करिती ॥१९॥

ऋषि उवाच: ॥२०॥

जय जयाजी शिववरदमूर्ती। जयजयाजी गिरिजापती।
जयजयाजी पशुपती। नमन तुज निजभावे ॥२१॥
नमन तुज चंद्रशेखरा। महंता गौरी प्राणेश्वरा।
जगन्नाथा परात्परा। महारुद्रा नमन तुज ॥२२॥
नमन कर्पुरगौरासी। नमन तुज भूत भावनासी
भुतनाथ भव्य शंकरासी। त्रिपुरान्तक नमन तुज ॥२३॥
नमन ज्ञानदायकासी। नमन वेद जाणे तयासी।
नमन वेदकर्त्यासी। वेदधर्तयासी नमन ॥२४॥
नमन सृष्टिकर्त्या ब्रह्मासी। नमन सृष्टिपालक विष्णूसी।
नमन संहार रुद्रासी। त्रिमूर्तीसी नमन असो ॥२५॥
ऐसी शिवाची स्तुती करोनी। ऋषी सभेत उभे राहुनी।
विठ्ठल अंत:करणी विराजोनी। अश्रू ढाळती तेथे ॥२६॥

शंभु उवाच: ॥२७॥

तुम्हा कवणे कष्टी केले। दुर्मदे तपभंग केले।
कोणी तुम्हा दु:खी केले। सांगा मज धर्मसुताहो ॥२८॥

ऋषि उवाच: ॥२९॥

महादुष्ट मणी-मल्ल दैत्य। श्रीशैल पर्वती राहत।
तप करुनी अद्‌भुत। प्रसन्न करिती ब्रह्मास ॥३०॥



Scanned by CamScanner

मणी-मल्लासी मिळाले वरदान। तुम्हासी जिंकू न शके कवण।
न जिंकती देव-दानव। अमरत्व प्राप्त झाले ॥३१॥
वरदाने उन्मन्त जाहले। महीतळी राज्य करू लागले।
सकळ जनाते पीडिले। ऋषी तेही न सोडले ॥३२॥
भगवंता, तू सर्वत्र होसी। आमुचा वृत्तान्त जाणसी।
महादोषाते खंडितोसी। आम्ही काय सांगू तुज ॥३३॥

शिव उवाच: ॥३४॥

ऋषी हो तुम्हाते तयांनी नाही पीडिले। दुष्ट कर्मे आयुष्य कमी केले।
कालसर्पाच्या पेटारे विंध्वसले। त्या मणी-मल्ल सुरांनी ॥३५॥
मी वधील त्या दैत्यांसी। म्हणोनी उठला महाक्रोधासी।
जटा आपटिल्या भूमीसी। उग्र रूप धरोनिया ॥३६॥
तेथे महामारी उपंजली। स्वरूपी अग्नी दिसली।
ऋषींनी तिला वंदिली। धृतमारी नाम तियेचे ॥३७॥
धृतमारी उभी ठाकली। दंत-दाढा विक्राळ दिसली।
जिव्हा तिची अग्नी भासली। अति-भयानक दिसे ॥३८॥
असे शिवसभेतील कथन। मल्हारीचे चरित्र पावन।
गुरुमाऊली करीतसे वर्णन। स्वामी, सेवेकऱ्यांसाठी ॥३९॥

इति श्री गुरुमाऊली विरचित, प्राकृत भावार्थ टीका
ब्रह्मांड पुराणे, क्षेत्रखंडे मल्हारी सप्तशती चतुर्थोध्याय
श्री कुलदैवत खंडेराव महाराज चरणार्पणमस्तु ॥४॥

॥ ओवी १४४॥



Scanned by CamScanner

## ।।अध्याय पाचवा।।

श्री गणेशाय नमः

सनत्कुमार उवाचः ।।१ ।।

शिवाने रूप घेतले मार्तंडभैरवाचे। बाहु भूषणे सर्पांचे।
शिरी शोभतसे मुकुट चंद्राचे। खड्ग-पाश हाती शोभे ।।२।।
सवे श्वान थोर गर्जत। गण सप्तकोटी परिवारित।
पिशाच्च समुदाय विराजित। शोभे तयात शंभूमार्तंड ।।३।।
समस्त देवांते आज्ञापित। यावे आपणही युद्धात।
सर्व सैन्यासहीत। अग्नी-शस्त्र-वाहनांसहीत ।।४।।
मार्तंडभैरवाच्या आज्ञेकरुन। आले युद्ध आनंदे करोन।
देव आपले सैन्य घेऊन। मिळते झाले कैलासासी ।।५।।
देवांच्या रणभूमीवरी। सैन्य वेगवेगळे परी।
स्वामी कार्तिक दावी कसुरी। त्यावेळी मार्तंड भैरवासी ।।६।।

कार्तिक उवाचः ।।७।।

मयूराचे वाहने आरुढले। शक्तीसहीत बैसले।
नीलवर्णी कवचे शोभले। ते वीर सैनिक माझे ।।८।।
ऐरावतावरी आरुढ झाले। इंद्राचे सैन्य ते भले।
दावानल दीप्ती शोभले। ते अग्नीचे सैन्य ।।९।।
कंठी घंटाचे नाद गर्जती। ते यमदूत असती।
निरंतर मांसभक्षण करती। ते सैन्य नैर्ऋत्याचे ।।१०।।
चंचळ पाश हाती मिरवत। ते सैन्य वायूचे।
ध्वजपताका असे हातात। ते वीर वरुणाचे ।।११।।



Scanned by CamScanner

कांचन अंकुश सोज्वली। ती सेना कुबेराची भली।
गजमुख परशू मिरवित। ती सेना गजाननाची ॥१२॥
शस्त्रे चामरे शुभ्र मिरविती। मृगमुखी सेना चंद्राची ती।
सप्त अश्वरथी शोभती। ते सैन्य जाणावे सूर्याचे ॥१३॥
अश्व-गज-हंसासारखे प्रेमळ। ते ब्रह्मदेवाचे दळ।
शंख-चक्र-गदा हातातील। सेना विष्णूची निघाली ॥१४॥

सनत्कुमार उवाच: ॥१५॥

देवसेना घेऊनी सारी। वधावया मल्ल त्रिपुरारी।
निघाला मणिचूर पर्वतावरी। शिव मार्तंडभैरव ॥१६॥
थोर सैन्य देखुनी। भयातूर दूत होऊनी।
आले मल्लासुरापाशी धावोनी। सांगती सैन्यवर्णन तयाला ॥१७॥

दूत उवाच: ॥१८॥

सैन्य आले जी असंख्यात। दाही दिशा व्यापिल्या अद्‌भुत।
प्रदीप्त शस्त्रे असे झळकत। आला तो मार्तंडभैरव ॥१९॥

मल्ल उवाच: ॥२०॥

काय वर्णिता तुम्ही सैन्यासी। आम्ही जाणतो शिवासी।
वृषभ वाहन असे त्यासी। भस्म गजचर्म परिधान करीतसे ॥२१॥
अंगी तया सर्पांची भूषणे। असे संपत्ती त्याची जाणे।
आम्ही काय युद्ध खेळणे। दैत्य हो मारा या दूतासी ॥२२॥

सनत्कुमार उवाच: ॥२३॥

दैत्यराज तो उठोनी। उंच शिखरावरी जाऊनी।
मार्तंडभैरवाचे सैन्य पाहोनी। भयभीत मानसी जाहला ॥२४॥



Scanned by CamScanner

मग वीराते पाचारोनी। रथ अश्व देवोनी।
बहुत सन्माने करोनी। युद्धास तयार करीतसे ||२५||
सुरा देऊनी असुराशी। देता झाला ऐरावतासी।
देतसे सुरपाती गजाशी। दैत्य त्या महाविरासी ||२६||
अमरमल्ल उध्हतासी। तांबुल दैत्य वैरीयासी।
जय मंगल तो अश्वासी। नर विध्वंसन दैत्य तो ||२७||
बोलविता झाला घुमवक्रास। शूर्पकर्ण ऊर्ध्व केशास।
सुरासन अश्वी जिव्हास। एकेक दुर्धर दुष्ट असती ||२८||
जय इंद्रनील मकरतुंडास। खड्‌गवीरा खड्‌ग दृष्टास।
नांगरधारी वक्रदंत, शुंड हस्तास। बोलाविता जाहला ||२९||
या अवधिया दैत्यांसी। वस्त्रे-अलंकार-तांबुलेसी।
पूजिता झाला सुवचनेसी। मल्लासूर दैत्यराज तो ||३०||
आज्ञा देता झाला तयासी। त्वरा करा संग्रामासी।
आपणही आरुढला इंद्ररथासी। शस्त्र, अस्त्र परिपुर्ण ||३१||
मल्ल तेजे असे दीर्घ होते। जैसा दीप विझता वाढत।
तैसा दैत्यराज भासत। मिरवत असे दुःसहपणे ||३२||
तैसाच मणीदैत्य शोभत। गजस्कंधी आरुढ होत।
शस्त्रे चामरी विराजित। उल्हासित मल्लबंधूस ||३३||
दैत्य सिंहनादे गर्जती। तेणे गिरीकंदरे दणाणती।
यक्ष, किन्नर शिखरे सोडिती। त्या पर्वताची ||३४||
त्या वस्तीचे ठायी तत्पर। ऐकोनी सैन्यघोष भयातूर।
होवोनिया नारी-नर। गमन करिते झाले तिथून ||३५||



Scanned by CamScanner

आता संग्रामाचा रस। सांगेन समर्थाचा दास।
जे बोलिला व्यास। ब्रह्मांड पुराणे क्षेत्रखंडे ||३६ ||

इति श्री गुरुमाऊली विरचित, प्राकृत भावार्थ टीका
ब्रह्मांड पुराणे, क्षेत्रखंडे मल्हारी सप्तशती पंचमोध्याय
श्री कुलदैवत खंडेराव महाराज चरणार्पणमस्तु ||५ ||

||ओवी १८०||

## ||अध्याय सहावा ||

श्री गणेशाय नम:

सनत्कुमार उवाच: ||१||

दुष्ट कळीकाळाते नाशी। श्रोतीय देत सर्व सिद्धीसी।
ते मल्हारी चरित्र पापविनाशी। सकळ भक्तजनांचे ||२ ||
सप्तकोटी गणांसहीत। मार्तंड-भैरव असे शोभत।
त्याहुनी अधिक परिवारित। मणी-मल्ल दैत्य महावीर ||३||
दोन्ही सैन्ये महाउन्मत्त। अतिक्रोधे संग्रामी भिडत।
वीर सिंहनादे गर्जत। बधिर झाले भूमंडळ ||४ ||
अद्‌भुत वार करिती। कोणाते त्रिशूळ मारिती।
खडंतर भाले वर्षती। खांडे करीती एकमेकांचे ||५ ||
कुंजळ कपाली कपाळ हानीती। अशुद्ध कुंकुमवर्णे दिसती।
लोक सारे भय पावती। कल्पान्त जाहला म्हणोनी ||६ ||
शस्त्रांस्त्रे वाजती सणसणाट। तेणे होतसे हृदयपुट।
संग्रामी धीर न धरवे नेट। भय सर्व लोकांशी ||७ ||



Scanned by CamScanner

आव्हाने-प्रतिआव्हाने। परस्परांना देती उभय सैन्ये।
मग तीव्र त्वेषाने। भिडले सैन्य सैन्याला ॥८॥

कोणी नाना रूपे घेती। कोणी विचित्र रुप पालटती।
कोणी वाहने बदलती। असुरी ऐसी चेटकी ॥९॥

चतुर मोठी देवसेना। दैत्यांची डाळ शिजेनां।
यास्तव मंत्रतंत्र जादूटोणा। अघोरी उपाय योजिती ॥१०॥

एकवीर शस्त्रघाते तुटले। अनेक वीर भूमी पडले।
आणिकांचे प्राण हरते झाले। महाक्रोधे करोनिया ॥११॥

जै दैत्य रणी पडले। ते मागुते नाही उठले।
शिवगण रणी पडले। ते मार्तंडभैरवे उठविले ॥१२॥

पडला देखोनी दळभार। कोपे खवळला मल्लासूर।
सारथीयासी बोले महावीर। मी वधीन तया सकळा ॥१३॥

खड्गदृष्ट उवाच: ॥१४॥

नमन माझे मल्लासुरासी। सैन्य न पुरे आपुल्या कोपासी।
मी असे तयार युद्धासी। विडा देई मज आता ॥१५॥

खड्गदृष्ट युद्धाशी आला। असंख्य सैन्य परिवाराला।
मद्यपाने उन्मत्त झाला। कुंजर-हत्ती-रथासह ॥१६॥

शंभु उवाच: ॥१७॥

आला महादैत्य युद्धासी। घेऊनी देवसैन्यासी।
शीघ्र युद्ध करावे यासी। स्वामी कार्तिक तुज ॥१८॥

स्वामी नमस्कारी मार्तंडभैरवासी। आपण पहावे युद्धासी।
मी मारीन या दुष्टासी। म्हणोनी युद्धास निघाला ॥१९॥



Scanned by CamScanner

आपल्या सैन्यासमवेत। कार्तिक रणी उभा राहत।
मयुराचे वाहन सवर्तमान। विचित्र छत्रे मिरवीत ॥२०॥

खड्‌गदृष्ट उवाच: ॥२१॥

तू मार्तंडभैरवाचा बालक असती। सैन्य आणोनी रक्षणासी।
सैन्यासमवेत आला आहेसी। षडानना बाळ तू ॥२२॥
तैसा नव्हे मी वीर। न धरू सेवकांचा आधार।
मी तुम्हाशी एकांगी लढणार। लेका लाडक्या गिरिजेचा॥२३॥
माझे तिखट बाण खडतर। तुझे कोमलांग सुकुमार।
तुजशी मारतील अपार। निवांत बैसावे दूर्गेजवळी ॥२४॥
ऐसा शब्द ऐकिला। कार्तिक महाक्रोधे भरला।
सहस्रबाण वर्षता झाला। त्या महादुष्ट दैत्यावरी ॥२५॥
बाण जवळी आले। दैत्याने खड्‌गाने छेंदिले।
वरच्यावरी निवारिले। अतिलाधवे करोनिया ॥२६॥
दैत्याने संधान केले। स्वामीने आकाशी उडवून चुकविले।
दैत्ये खुरूपी संधान केले। सवेची बारा बाण सोडिले ॥२७॥
तयांने स्वामीसी घायाळ केले। व्याकुळ झाला गौरी पुत्र।
स्वामींनी शक्ती सोडिली। दैत्ये बाणे निवारीली ॥२८॥
न सावरत जवळ पातली। वक्षस्थळी आदळली दैत्याच्या॥२९॥
शक्तिघाते विव्हळ जाहला। रणभूमीसी उताणा पडला।
प्राणाते त्याजिता झाला। खड्‌गदृष्ट महादैत्य ॥३०॥
हा दैत्य मारिला रणाशी। सैन्य पळाले दाही दिशी।
गण मारीते तयासी। (अशुद्धाचा) पूर आला ॥३१॥



Scanned by CamScanner

ऐसा खड्गदृष्ट वधिला। स्वामी कार्तिक विजयी झाला।
सकळ देवे पुष्पवर्षाव केला। स्वर्गातुनी तयेवेळी ॥३२॥
पुढील कथेचा सौरस। उल्कामुखाशी युद्ध करीत गणेश।
ते सांगेल समर्थाचा दास। गुरुमाऊलीच्या मुखाने ॥३३॥

इति श्री गुरुमाऊली विरचित, प्राकृत भावार्थ टीका
ब्रह्मांड पुराणे, क्षेत्रखंडे मल्हारी सप्तशती षष्ठोध्याय
श्रीकुलदैवत खंडेराव महाराज चरणार्पणमस्तू ॥६॥
॥ओवी २१३॥

## ॥अध्याय सातवा॥

श्री गणेशाय नम:

सनत्कुमार उवाच: ॥१॥

स्वामींनी खड्गदृष्ट वधिला। मल्लासूर कोपे खवळला।
उल्कामुखासी आज्ञा देता झाला। युद्धालागी दैत्येंद्र ॥२॥
उल्कामुख रथारुढ जाहला। सकळ सैन्य परिवाराला।
घेऊनी रणभूमीसी पातला। महाक्रोधे करोनिया ॥३॥
तया येता देखिला। शंभू तयावरी कोपला।
मग आज्ञा देता झाला। श्रीगणेशास तयावेळी ॥४॥
श्री गणेश रथारुढ झाला। गणाचे सैन्य घेऊनी निघाला।
उल्कामुखासमोर उभा ठाकला। सैन्य परिवारासहित ॥५॥

उल्कामुख उवाच: ॥६॥

अरे गौरीच्या बालका। सुखे खाशी मोदका।

येथे काय अश्वखा। जाई परतोनी माघारा ॥७॥

श्री गणेश उवाच: ॥८॥

अरे दैत्या अधमासी। उगाची किती बडबडसी।
भक्षिण सैन्य मोदकाशी। क्षण एकही न लागता ॥९॥
मी आहे शिवाचा बालक। तुमचा झालो अंतक।
संग्रामी माझा धाक। तुम्हा सकळ दैत्याशी ॥१०॥
ऐसे गणेश बोलता। दैत्य झाला कोपता।
तीक्ष्ण बाण वर्षता। रथ तोडी गणेशाचे ॥११॥
गणेश लाजला मानसी। आवेशोनी मग क्रोधाशी।
सोडीता झाला अस्त्राशी। दैत्य घायाळ रणभूमी ॥१२॥
राक्षस मग काय करी। सिंहाचे रूप धरी।
गणेश शुंडास विदारी। तिखट नखे करोनिया ॥१३॥
गजानन महाकोपला। दंड हृदयावरी मारिला।
शीर छेदिता जाहला। उडला प्राण दैत्याचा ॥१४॥
उल्कामुख सैन्येसी पडता। मल्ल कोपे खवळला।
कुंतलोमास झाला देता। विडा युद्धास जावया ॥१५॥
कुंतलोम युद्धासी निघाला। सवे लक्ष दळभार चालिला।
चतुरंग सेनी मिरविला। महावीर बलाढ्य तो ॥१६॥
दैत्य आला संग्रामास। मार्तंडभैरव पाहुनी त्यास।
आज्ञा देतसे जयनंदीस। जावे तुवा रणभूमीत ॥१७॥
नंदी संग्रामी निघाला। शिवाचे रूप घेता झाला।
त्रिनेत्री पंचवक्री मिरविला। नागभूषणे चंद्रशेखराचा ॥१८॥



Scanned by CamScanner

सुवर्णाचे रथी बैसला। त्रिशुलादी आयुधे सकला।
तयाशी कुंतलोम बोलला। रणभूमी तयेवेळी ॥१९॥

कुंतलोम उवाचः ॥२०॥

अरे तू शिवासारखा दिसतोसी। तयाची आयुधे घेशी।
म्हणून काय शंकर होसी। तू वाहन तयाचे ॥२१॥

जयनंदी उवाचः ॥२२॥

महादेवाचे कृपेकरोन। शिवस्वरूप पावलो जाण।
आम्ही आहो तयांचे गण। आलो वधार्थ तुझिया ॥२३॥
मग कुंतलोम रागावोनी। ललाटीचा स्वद पुसोनी।
धनुष्याला बाण चढवोनी। संधानकरिता झाला ॥२४॥
शतलक्ष बाण सोडिले। अति तिखट ते वर्षावले।
जयनंदीवरी टाकिले। महादैत्ये रणभूमीसी ॥२५॥
नंदीने बाण निर्वाणीचा काढला। महाहलाहले निर्मिला।
सर्व शक्तीने ओढीला। सोडिता जाहला दैत्यावरी ॥२६॥
तो घोंगावत जवळी आला। हृदय फोडुनी गेला।
पृष्टी रंध्रे निघुनी गेला। दैत्य व्याकुळ जाहला ॥२७॥
दैत्य क्रोधाने शस्त्रे सोडिता। अनेक बाणे वर्षता।
नंदी पराभव पावता। झाला तयावेळी ॥२८॥
सारथी भूमीवरी पाडिला। अश्वरथ मुरडिला।
ध्वज-धनुष्य मोडिता जाहला। मुष्टीने जयनंदीचे ॥२९॥
देवसैन्य पळाले। दैत्य सेनेस भक्षिले।
खड्गाते तुरगा मारिले। सेनेने तयावेळी ॥३०॥

सैन्य भक्षिले देखोनी। नंदी क्रोधे आवेसोनी।
रथ सारथी घेवोनी। सिंहनाद करिता जाहला ||३१||
क्रोधे नेत्र धगधगीत। प्रलयाग्नीसारिखा दिसत।
शर जाळते सोडीत। जयनंदी दैत्यावरी ||३२||
ते शर जाळे काय केले। सैन्य अवघेची मारीले।
मग अग्नि बाणाते काढीला। कुंतलोम्यावरी सोडीला ||३३||
तो कुंतलोम्याच्या हृदयी आदळला। रक्त प्राशन करित झाला।
प्राण घेता जाहला। त्या कुंतलोम महादैत्याचे ||३४||
ऐसा कुंतलोम मारीला। जयनंदी विजय पावला।
पुष्पवर्षाव देवी केला। ऋषींनी दिला आशीर्वाद ||३५||
उल्कामुख, कुंतलोम मारीले। गणेश, नंदी विजय पावले।
आता मणीदैत्य कैसे झुंजीत। ते परिसावे श्रोते हो ||३६||

इति श्री गुरुमाऊली विरचित, प्राकृत भावार्थ टीका
ब्रह्मांड पुराणे, क्षेत्रखंडे मल्हारी सप्तशती सप्तमोध्याय
श्री कुलदैवत खंडेराव महाराज चरणार्पणमस्तू ||७||
|| ओवी २४९ ||

## ||अध्याय आठवा||

श्री गणेशाय नमः

सनत्कुमार उवाचः ||१||

अशी कथा सांगतो। ऐका समस्त ऋषिवर हो।
सेनापती पडिलाचा वृत्तान्त। मणी-मल्लासुरांनी ||२||



Scanned by CamScanner

ते वेळी मणी मल्ल दोघे जण। महा क्रोधे तापले परीपुर्ण।
रणतुरे वाजवीत गहन। रणभूमीसी निघते जहाले ||३||

मणी दैत्य उवाच: ||४||

सांगतो तुज मल्लासुरासी। युद्ध करीत मार्तंडभैरवासी।
रणी पाहे माझ्या युद्धासी। जे न देखिले कधी ||५||
अरे ज्यास स्वामी म्हणती। इंद्रादिक देव पूजिती।
रणी जिंकील मी शिवासी। करोनी युद्ध संग्रामाशी ||६||
मी जिंकीन त्या भैरवासी। प्रसन्न करेन तुम्हासी।
जय पावेन निश्चयेसी। ऐसे जाण दैत्यराजा ||७||
मणी दैत्य ऐसे बोलीला। सिंहनाद गर्जिन्नला।
त्रिभुवन आंदोळता आला। त्या अति गर्जनेने ||८||
नादे ब्रह्मांड गर्जत। तेणे समुद्र उचंबळीत।
सृष्टी सारी भयचकित। झाली तयेवेळी ||९||
कपाळी सिंदूर चर्चिला। दैत्य उंच वाढला।
रत्न मुकुट घेता झाला। मेघमंडळावरी ||१०||
वीस भुजा असे शोभत। अंगी चंदन चर्चित।
विजेसारखी कुंडले चमकत। मणी दैत्य महावीर ||११||
पर्वतासारिखा दिसत। चरणचाली असे चालत।
पृथ्वी सारी कंपायमान होत। येता झाला रणभूमी ||१२||
येता पाहोनी मणीसुराशी। मार्तंडभैरव म्हणे गणासी।
दूर व्हावे तुम्ही युद्धासी। मी पाहीन दैत्य बलवान ||१३||
संग्रामाचे इच्छे करुन। मार्तंडभैरव रणी चालीला आपण।



Scanned by CamScanner

सिंहनादे करी गर्जन। आंदोळले त्रिभुवन ॥१४॥

मणी दैत्य उवाचः ॥१५॥

अरे महादेव म्हणती तुजसी। आज कोठे लपलासी।
भिक्षा सोडून आलासी। सकल गणांसहीत ॥१६॥
ऐसा बोल ऐकिला। भैरव कोपे आवेशला।
गदा घेऊनी धाविला। त्या अतिक्रूर दैत्यावरी ॥१७॥
दैत्याच्या मस्तकी फेकिली। लोहभार सहस्रांची निर्मिली।
उंच गदा ती महाबळी। दैत्याने खड्ःगाने निवारीली ॥१८॥

मणी दैत्य उवाचः ॥१९॥

तुझ्या बळाचा भरवसा आम्हासी। परी तू स्थूल दिसतोसी।
कैसे युद्ध करीसी। आम्ही असो महाबली ॥२०॥
दैत्याचे कृत्य देखोनी। शंभु प्रज्वळला अंतःकरणी।
सोडिले सहस्र प्रभव बाणी। त्या मदोन्मत्त दैत्यावरी ॥२१॥
बाणजाळ येता देखिले। दैत्ये खड्गे छेदिले।
जैसे योगेश्वरी जिंकिले। चित्तासहीत विषयासी ॥२२॥
दैत्य काय केले। अकराशती खुरपी संधान केले।
मार्तंड भैरवे भस्म केले। जोरदार हुंकार करोनिया ॥२३॥
देवाने बाण धगधगीत सोडिले। ते तयाच्या मुकुटी आदळले।
रत्ने विखुरली तयेवेळी। जशी नक्षत्रे पडती भूमीवरी ॥२४॥
खड्ग चंद्रचुडे करी घेतले। मणी दैत्यावरी धावले।
वेगाने शीर तयाचे तोडिले। त्या दैत्य मणिकासुराचे ॥२५॥
मायावी दैत्य काय केले। शरभ सावजाचे रूप धरिले।



Scanned by CamScanner

शंकराशी चाऊ लागले। त्यावेळी रणभूमीसी ॥२६॥
शंभूने कर्तरी शस्त्र घेऊनी। दैत्य कापिला क्रोधे करोनी।
दैत्य गिळी कर्तरी मुख पसरोनी। जणू गुटिका जैसी ॥२७॥
मग मार्तंडभैरव कोपला। वक्षस्थळी गदा मारिला।
पृष्ठीवरी दैत्य पाडीला। तो महादैत्यसूर ॥२८॥
दैत्य तुरुंगावरी आरुढ झाला। खड्‌ पडता पळू लागला।
शस्त्रे जरी मारिला। तरी तो युद्ध करीतसे ॥२९॥
यावरी गिरिजापती आवेशला। अग्न्यस्त्र टाकीत झाला।
मणी दैत्य जिव्हाग्री पोळला। उदकी पडला अश्वासहीत ॥३०॥
मणी पडला जेथे अश्वासहीत। तेथे तुरंगतीर्थ झाले त्वरित।
बहुता पुण्य असे देत। या भूमंडळामाझारी ॥३१॥
दैत्य महादेवाते लक्षीत। तिखट बाणे संधान करीत।
ब्रह्मांड सर्व व्यापीत। ते शरजाळे करोनिया ॥३२॥
असंख्यात शरपातले। शंभूचे अंगी भेदिले।
कपाळी कुंडली लागले। महादेवाच्या महामुकुटावरी ॥३३॥
बाणे शिवात खडतरले। शिरी भूषणे सर्प भेदले।
मग मोडते झाले। रुंडमाळेते शिवशंकराच्या ॥३४॥
यानंतर शंभू आवेशला। मणीला त्रिशूळ मारीला।
अग्नीस्वरूपे जाहला। आघात वक्षस्थळी दैत्याच्या ॥३५॥
दैत्य विव्हळ जाहला। भूमीवरी पडिला।
डोळे फिरवू लागला। मणी दैत्यासुर ॥३६॥
देवाने चरण उचलिला। दैत्याच्या मस्तकी धरिला।



Scanned by CamScanner

तयाने हस्ते धरीला। वैर विसरोनी देव संतोषला ||३७||

मणीकासुर उवाच: ||३८||

रणी मृत्यू देखिलासी। न सोडी तुझिया चरणासी।
साक्षात जगदिश्वर होसी। नमन माझे तुझसी ||३९||
तू भूताचा होशी स्वामी। सकल जनांचा अंतर्यामी।
नागेंद्रभूषणा सर्व स्वामी। तुज नमन माझे ||४०||
नमन नीलकंठा रौद्र। दानवाच्या अतीमहारुद्र।
शंभू शांता देवेंद्रा। तुज नमन माझे ||४१||
नमन रत्नमुकुटधरासी। नमन गंगाप्रियासी।
नमन रजनीरूपासी। तुज नमन माझे ||४२||
नमन त्रिशूळ त्रिगुणात्मका। परमहंसा स्वस्तिकारका।
खड्ःगपात्रधरा कैवल्यदायका। तुज नमन माझे ||४३||
नमन भक्तजनआनंद करियासी। विश्वनायक शेखरासी।
नमन डमरु हस्ता सदाशिवासी। तुज नमन माझे ||४४||
दैत्याची स्तुती ऐकोनी। प्रसन्न झाला शूलपाणी।
बोलता झाला कृपावचनी। त्या मणिकासुर दैत्यासी ||४५||

शिव उवाच: ||४६||

मी तुझ्याशी युद्ध करुन। पूर्ण भक्तीने झालो प्रसन्न।
वर माग मोक्षसाधन। जो असेल चित्ती तुझिया ||४७||
मी देईन तुज वर। ऐसे बोलता चंद्रशेखर।
काय मागता झाला मणिकासूर। परिसा श्रोते हो ||४८||



Scanned by CamScanner

मणिकासुर उवाचः ॥४९॥

देवा, तू मज झालासी प्रसन्न। जे मी केले तुझे स्तवन।
त्याचे करिती पठण। त्यासी अखंड लक्ष्मी ध्यावी ॥५०॥
ते अश्व-रथ-गजाते पाविजे। पुत्रपौत्री राज कीजे।
महान सौख्य लाभिजे। मुखीवाणी सुललित असो ॥५१॥
स्तोत्र पठण जयासी। मोक्ष ध्यावे निर्धारिसी।
मस्तक माझे तुझिया चरणासी। निरतंर असो द्यावे ॥५२॥
माझे रूप तुरंगासहीत। ते असावे तुज सान्निध्यात।
ऐसे वचन ऐकोनी समस्त। शंभू बोले तयाशी ॥५३॥

मार्तंडभैरव उवाचः ॥५४॥

मणी तू मागितले ज्या वरासी। ते तू पावसी निर्धारिसी।
तू पावसी मोक्षासी। माझिया कृपेकरोनी ॥५५॥
जे नर हे युद्ध ऐकती। जे नर भक्तीने पठण करिती।
ते उत्तम सिद्धी पावती। भैरवकृपे करोनिया ॥५६॥
मणिकासुर ऐसे वधिला। शिव प्रसन्न जाहला।
ब्रह्मांड पुराणी व्यास बोलीला। सप्तशतीत असे वर्णीला ॥५७॥

इति श्री गुरूमाऊली विरचित, प्राकृत भावार्थ टीका
ब्रह्मांड पुराणे, क्षेत्रखंडे मल्हारी सप्तशती अष्टमाध्याय
श्री कुलदैवत खंडेराव महाराज चरणार्पणमस्तू ॥८॥
॥ ओवी ३०६॥

Scanned by CamScanner

## ।।अध्याय नववा।।

श्री गणेशाय नमः

सनत्कुमार उवाचः ।।१ ।।

स्तुतीने मार्तंड भैरव संतोषला। मणिभक्तीने प्रसन्न झाला।
मल्लाते रक्षावे इच्छिता जाहला। मणीचा बंधू म्हणोनिया ।।२।।

मार्तंडभैरव उवाचः ।।३ ।।

बोलावे म्हणे विष्णूसी। तुम्ही सांगावे मल्लासुरासी।
सैन्यासहीत जावे पाताळासी। प्राण आपुला वाचवावा ।।४।।
तू गेलीया पाताळभुवना। ऋषी करतील अध्ययना।
देव पावती पूजना। या पृथ्वीतलावरी ।।५ ।।
अंत:करणे निर्मळ होती। यज्ञ-यागादी करती।
राजे राज्य पावती। ऐसे बोलावे तयासी ।।६ ।।
देव यज्ञाचे अंश भक्षिती। स्वर्गलोकी सुखे वसती।
तू न जरी जासी पाताळासी। ह्या भैरव वधेल तुज ।।७ ।।
ऐसे शंभुवचन ऐकोनी। विष्णू गरूडावरी बैसोनि।
एकलाची शांत मूर्ती धरोनी। मल्लाकडे जाता झाला ।।८।।
मल्लासुराकडे श्रीविष्णू येता। दैत्येश्वर तयासी पूजिता।
महाविष्णू झाला सांगता। मल्लासूर महादैत्यासी ।।९ ।।

भगवान विष्णू उवाचः ।।१० ।।

मी प्रसन्न जाहलो तुजसी। बहुत दैत्य पडिले रणासी।
सकळ सैन्य परिवारासी। अतिनाश जाहला ।।११ ।।

रणी बंधू गोत्रज पडिले। मित्र-सोयरे वधिले।
आप्त, विश्वासू मारिले। महाक्रुर रण असे ॥१२॥
तुझा प्राणसखा मणिकासूर। तोही मारिला महावीर।
ऐसे समस्त झुंजार वीर। मारविले तुवा दुर्मदा ॥१३॥
मारिले असंख्य महागजाते। वायू वेगिया तुंरगमाते।
रत्नखचित अनेक रथाते। पडिले असंख्यात पायदळाते ॥१४॥
आता ऐसी बुध्दी किजे। मार्तंडभैरवाते शरण जाईजे।
दैत्यसहीत पाताळी राहिजे। रक्षी प्राण आपुले ॥१५॥
क्रोधयुक्त मार्तंडभैरवासी। मृत्यूरस वसे जयापाशी।
तू युध्दसमर्थ नव्हेसी। ऐक माझे दैत्यराजा ॥१६॥
मार्तंडभैरवाच्या क्रोधानळासी। तुझा देह जाईल आहुतीसी।
प्रचीती आली तुम्हासी। मग विषभक्षण का किजे ॥१७॥
प्रल्हादाच्या कुळी जन्मलासी। म्हणोनी सांगतो हितासी। ऐक
माझ्या वचनासी। जावे पाताळी तुवा ॥१८॥
ऐकोनि विष्णूचे वचन। मल्लासूर करे नमन।
स्वामी तू मज प्रसन्न। झाला या दैत्यासी ॥१९॥

मल्लासूर उवाचः ॥२०॥

मी मागेन ते द्यावे। स्वामी तू येथे रहावे।
युध्द माझे पहावे। त्या शिव मार्तंडभैरवासी ॥२१॥
गण शिवासहीत वर्तमान। रणी पडता जाण।
तुज मी रक्षीन। प्रल्हादे पूजिला म्हणुन ॥२२॥
तु उंच शिखरावरी राहे। माझ्या युध्दाचे कौतुक पाहे।



Scanned by CamScanner

मी महान दैत्य आहे। वधील मी सर्वांस ॥२३॥
शंभूने रणी मारिला। सैन्यासहीत मणी गिळिला।
पाहीन मी प्राणसखा आपुला। माझ्या हृदयी तो वसे ॥२४॥
भैरवाचे जठर विदारीन। रक्ताच्या नद्या वाहवीन।
तयामध्ये स्नान करीन। विझवीन जठराग्नी माझा ॥२५॥
माझी शस्त्रे भुकेली असती। रुधीर प्राशन करु पाहती।
तोवरी तृप्ती न पावती। माझे अंत:करण स्थिर नोहे ॥२६॥
देवाचे रक्तबिंदू करुन। आकाश करीन परिपूर्ण।
तृप्ती पावेन प्राण। ऐसे जीवित्वे काय काम ॥२७॥
त्या मार्तंडभैरवाचे गण। काय युद्ध करतील जाण।
जैसा अग्नी तृणी दाहीन। तैसे करेन समस्तांसी ॥२८॥
दाढांनी चर्वण करोन। देवासहीत भक्षीन।
बंधू मणिकाचा सूड घेईन। ऐसा गर्जे दैत्येश्वर ॥२९॥
बंधुशोके हृदयी पोळत। समुद्र शोषिला तरी नाही विझत।
आता मी नाही सोडत। शिवासहीत सर्व देवगणास ॥३०॥

श्री विष्णू उवाच: ॥३१॥

सांगतो मल्लासूर तुजशी। ऐक माझे परियेसी।
सोडुनी आत्मघातकीपणाशी। सुखे पाताळी वसावे ॥३२॥
पतंगाची वृत्ती धरिसी। तरी निर्धारी मुत्यू पावसी।
नीति दोषी कारण होसी। ऐक दैत्यराजा ॥३३॥

दैत्य उवाच: ॥३४॥

प्राणभये जे सत्त्व टाकिती। ते कुंभीपाकी पचती।



Scanned by CamScanner

आकल्पावरी तेथे वसती। म्हणुनी लढेन भैरवासी ||३५||
ऐसा विष्णुनी बोधिला। दैत्य मानिता नाही झाला।
तैसा संग्रामी आला। दैत्यराज मल्लासूर तो ||३६||
गुरुमाऊलीची थोरी। प्रसन्न करीतसे मल्हारी।
ही कथा तापत्रयाते हरी। स्वामी सेवेकऱ्याच्या ||३७||

इति श्री गुरुमाऊली विरचित, प्राकृत भावार्थ टीका
ब्रह्मांड पुराणे, क्षेत्रखंडे मल्हारी सप्तशती नवमोध्याय
श्री कुलदैवत खंडेराव महाराज चरणार्पणमस्तु ||९||
||ओवी ३४३||

## ||अध्याय दहावा||

श्री गणेशाय नम:

सनत्कुमार उवाच: ||१||

ऐसा विष्णूंनी समजावला। दैत्य क्रोधे खवळला।
मदे उद्दत संग्रामी आला। अनेक योद्धे घेऊनिया ||२||
माथा शेंदूर असे लाविला। मस्तकी जटा मिरविला।
उंच इतका मेघमंडळी लागला। नीळ मेघ वर्णे दिसे ||३||
मल्लासूर शस्त्रे मिरवीत। मायावी दैत्यसमवेत।
अंगी कस्तुरी चर्चित। कंकुमगारसहीत दैत्य ||४||
ब्रह्माने काळकुट निर्मिला। काजळाचा गिरी ओतला।
आकाशी स्तंभ उभारला। इंद्रधनूचा तयेवेळी ||५||
महाकाय योद्धा मल्लासूर। न वर्णवे त्याचा विस्तार थोर।



Scanned by CamScanner

रणभूमीस आला महावीर। सिंहनादे गर्जना करी ।।६।।
त्याच्या सिंहनादे करून। मेरु छत्राखाली आला आपण।
कैलासही कंपे भये करून। मुकुट पडला पर्वताचा ।।७।।
भये कंप झाला समुद्राशी। वडवानल सेवी तयासी।
शेषही कापे चळणेसी। भूमी पडू म्हणतसे ।।८।।
त्याचे भयनादे करोनी। पृथ्वी आली कंपमानोनी।
सिद्धांनी सोडली आसनी। तपभंग तयांचा ।।९।।
अनेक सैन्य परिवारीला। मल्लासूर उभा रणी राहिला।
मार्तंडभैरवे देखिला। मग आज्ञायित धृतमारीसी ।।१०।।
आज्ञेनी धृतमारी उठली। हाताने कुंजराते धरती झाली।
आकाशे फेकती जाहली। अतिप्रौढी करोनिया ।।११।।
अश्वासहीत रथ गिळती। कुंजरे कुंजराते लढती।
तुंरंगमे तुरंगे मारिती। फेके उचलोनी महारथासहीत ।।१२।।
शस्त्रधारे दैत्ये पडताती। तयांते जिव्हेने उचलती।
थोर कडकडाटे चघळती। धृतमारी दैत्य सैन्यासी ।।१३।।
नानाविध शस्त्रे गिळती। ते तिचे जठराग्नी भस्म होती।
ती अन्न जाहली होती। धृतमारीस त्या वेळी ।।१४।।
त्या बळे वाढू लागली। अधिक पुष्ट झाली।
दैत्य सैन्य भक्षू लागली। मल्लासूर कोपला तिच्यावरी ।।१५।।

दैत्य उवाचः ।।१६।।

सैन्य भक्षण ग्रास करुनी। तू पुष्ट झाली अससी रणी।
न पुरसी माझ्या ग्रासालागोनी। धृतमारी असे जरी महान ।।१७।।

ऐकोनी ऐसी दैन्यांची बोली। धृतमारी उंच जाहली।
सहस्त्र बाण वर्षो लागली। तये वेळी रणभूमीसी ॥१८॥
गगनी मेघमाळा मोडली। धारा पर्वतावर वर्षली।
तैसी धृतमारी सोडती झाली। शरवर्षाव दैत्यावरी ॥१९॥
ते बाण खाली आले। महासुराच्या अंगी लागले।
पडताच मोडते झाले। मल्लासूर दैत्यराजासी ॥२०॥
आकाशी गदा भिडवून। धृतमारीस मारे रागावून।
तीही करी निवारण। गदा हाती घेऊनिया ॥२१॥
दैत्यराज त्रिशूळ हाती घेऊन। धृतमारीवर गेला धावोन।
तीही टाके मोडून। त्या मल्लासूर दैत्याचा ॥२२॥
धृतमारी कोपे आवेशली। खड्गाने दैत्यास मारती झाली।
दैत्याची भूजा तुटली। दैत्य होतसे विव्हळ ॥२३॥
तेथुनी शोणीत निघाले। तेथे शोणीत तीर्थ जाहले।
मानवासी पवित्र करते झाले। त्या मणिचूर पर्वतावरी ॥२४॥
मल्लासुराने काय केले। मायावी भूजेस काढिले।
खड्ग घेऊनी धावले। धृतमारी तयेवेळी ॥२५॥
धृतमारी भैरवनादे गर्जली । गगनाप्रती जाती झाली।
प्रचंड शिला बरसू लागली। दैत्यावरी रणभूमीसी ॥२६॥
दैत्यही आकाशी उडला। मग धृतमारी आली भूमंडळा।
अमोघ बाण सोडिते जाहला। धृतमारीवरी गगनातुनी॥२७॥
असंख्य बाण मारिले। शरीर ते आदळले।
धृतमारीस भेदिते जाहले। ती पडे रणभूमीसी ॥२८॥



Scanned by CamScanner

बाणे भेदिले मस्तकासी। शत लागले स्तनासी।
स्कंधी, वक्षस्थळी ग्रीव्हेसी । शत शत भेदीते जाहले ॥२९॥
जानू जंघा उराशी। कपाळी, गंडस्थळी, नाभीसी।
असंख्यात लागले धृतमारीसी। विव्हळ जाहली ती ॥३०॥
धृतमारी पडली पाहोनी। मार्तंडभैरव कोपला मणी।
निघाला दैत्यास सामोरा होऊनी। दैत्त्यान्तक महादेव ॥३१॥
लोण्याच्या अगणित राशी। अग्नी जैसा नाशी।
तैसा करील मल्लासुरासी। दैत्यनाशक मार्तंडभैरव ॥३२॥
निर्वाण संग्राम सुरस। मल्लासुरास वधेल महेश।
सांगेन भैरवाचा दास। मी स्वामी सेवेकरी ॥३३॥

इति श्री गुरुमाऊली विरचित, प्राकृती भावार्थ टीका
ब्रह्मांड पुराणे, क्षेत्रखंडे मल्हारी सप्तशती दशमोध्याय
श्री कुलदैवत खंडेराव महाराज चरणार्पणमस्तु ॥१०॥
॥ ओवी३७६ ॥

## ॥अध्याय अकरावा॥

श्री गणेशाय नमः

सनत्कुमार उवाचः ॥१॥

धृतमारीसी विजयी होऊन। अतिशौर्य उन्मत्त होऊन।
मद्ये प्राशन करुन। मार्तंडभैरवासी दैत्य बोलत ॥२॥

दैत्य उवाचः ॥३॥

मी मल्ल सांगतो तुजसी। तुवा जावे कैलासासी।



Scanned by CamScanner

तू न पुरसी माझ्या युद्धासी। दैवहीन असे तू ॥४॥
सेवितो मी अनेक कुंजरी। तु एका वृषभावरी।
तुज मजसी नसे सरी। माझे भाग्य असे थोरी ॥५॥
तू गजचर्म पांघरसी। दिव्य वस्त्रे परिधान आम्हासी।
तू सर्पांची भूषणे लेईशी। आम्हा असती कांचनासी ॥६॥
सुवर्णरजमिश्रित चंदन। त्याचे मजसी लेपन।
तूज भस्माचे उधळण। अस्थी, चुर्णसहीत स्मशानाचे ॥७॥
सहस्र स्त्रिया आम्हासी। एक वृद्धा असे तुजपाशी।
माझे राज्य त्रिभुवनाशी। मी असे थोर ॥८॥
म्हणे युद्ध करील मजसी। लाज नाही तुझ्या चित्तासी।
स्पर्धाकरिता गजाशी। काय उंदीर समर्थ होय ॥९॥
समुद्राचे करावया प्राशन। बालक समर्थ होईल।
प्रलयाग्नीचे शमन। काय पतंग करेल ॥१०॥
काळातील मेघ निवारावयासी। काय समर्थता वायूसी।
सुवर्णगिरीचे उन्मळण करण्यासी। गजासी सामर्थ्य नसे॥११॥
ऐसी कठीण वचने ऐकोनी। मनी खवळला शूलपाणी।
सोडिले अनेक तिखट बाणी। त्या मदोन्मत्त दैत्यावरी ॥१२॥
बाण येता देखिले। दैत्य पट्टीशे निवारिले।
उग्र करवाळ करी घेतले। वेगे धावे शिवावरी ॥१३॥
दैत्य येता देखुनी। शंकरे दृढ मन करोनी।
खडतर शर सोडुनी। दैत्यराजाशी रोखिले ॥१४॥
बाण मल्लाचे अंगी आदळले। आदळताच ते मोडिले।



Scanned by CamScanner

दैत्ये तृणापरी मानिले। खडतर बाण शिवाचे ||१५||
भैरवे उड्डाण केले। तिखट खड्ग करी घेतले।
दैत्याच्या वामभुजी मारिले। मग डमरु नाद केला ||१६||
डमरु नादे ब्रह्मांड गर्जिले। दैत्ये सिंहनाद केले।
दोघांचे युद्ध प्रवर्तले। उपमा नाही तयासी ||१७||
मेरु पर्वताचिया शिखराशी। कोणता पर्वत साजे उपमेसी।
तैसे मार्तंडभैरवाच्या उपमेसी। कवण वर्णू शकेल ||१८||
दैत्यांने गजरुप धरिले। डोके गगनासी लागले।
सप्त सागरासी आंदोळले। पुच्छाचे विक्षेप करोनिया ||१९||
मदाचिया धारा पडती। तेणे पर्वत ओले होती।
मदोन्मत्त तो गजपती। वेगे चाले रणभूमीसी ||२०||
गजाने शुंडादंड उचलिला। तेणे ग्रह नक्षत्रा पळ काढीला।
चंद्र सूर्याच्या आड आला। सर्वत्र अंधार जाहला ||२१||
सिद्धासी वाटे भीती। गृहे सोडोनिया पळती।
दैत्य सहस्र गर्जती। त्या वेळी रणभूमीसी ||२२||
गर्जने भूमी आंदोळती। मेघे भूमीवरी पडती।
आवेशला तेव्हा पशुपती। दैत्यराज मल्लासुरावरी ||२३||
करी खंड्वाग घेतले। दैत्याच्या मस्तकी मारिले।
मल्ले वरीच्यावरी धरीले। चर्म खेटके करोनिया ||२४||
मल्लासूर हासे शंकरासी। बळ तुझे कळले आम्हासी।
भैरवे सोडिली अग्नी अस्त्रासी। दैत्यावरी अति क्रोधे ||२५||
अग्निज्वाला तेव्हा निघती। पर्वत सिंदूरवर्णे होती।



Scanned by CamScanner

सागरे जलचर तडपती। महादाहे करोनिया ॥२६॥
अस्त्रधूम आकाशी जात। नक्षत्रे आच्छादली जात।
चंद्र-सूर्याची लोचने गळत। त्या महाधुमा करोनिया ॥२७॥
अग्नि रथासी जाळीत। लोहाची चक्रे वितळत।
वीरांचे टोपही तापत। ते काढुनी फेकीत ॥२८॥
तयांचे शस्त्रभार तापले। पायाते चटके बसले।
मस्तकाचे केश जळाले। त्या महावीराचे ॥२९॥
छत्रे चामरे ध्वज जळती। काजळी होऊन पडती।
अशी अग्नी अस्त्रे केली गती। त्या वेळी रणभूमीची ॥३०॥
अग्नीच्या दाहे करुनी। रक्तवर्ण झाले गगन।
मल्लासुराचे अंग तापून। तडातडा फोड उठती ॥३१॥
शस्त्राचा प्रभाव थोर। व्याकुळ झाला मल्लासूर।
होऊनी धैर्याचा सागर। सोडी मग पर्जन्यास्त्रासी ॥३२॥
मेघ आकाशी जमले। मुसळधार वर्षो लागले।
अग्नी अस्त्रासी निवारिले। पर्जन्यधारांनी रणभूमीवरी ॥३३॥
मेरु अग्नी अस्त्रे तापला। पर्जन्याने भिजविला।
जणू वर्षाकाळ पावला। तये वेळी सर्वत्र ॥३४॥
दैत्याची शस्त्रे अग्नी तापविली। पर्जन्याने ती भिजविली।
निश्चल होऊनी राहिली। जणू सारे नि:शस्त्रे ॥३५॥
पाषण मेघ वर्षती। जणू आकाश, भूमी पडती।
गण, दानवांची मस्तके फुटती। महापर्जन्य तो ॥३६॥
महावीर ते घाबरले। अश्व-कुंजराआड दडले।



Scanned by CamScanner

तुरंगे आकाशी उडाले। पुढलिया चरणी करोनिया ॥३७॥
मेघधारा वर्षती। सर्वत्र जल पावती।
प्रलय समुद्रापरी दिसती। जलमय सारी रणभूमी ॥३८॥
शस्त्रे सारी जली तरती। रथ असंख्यात बुडती।
शव सर्वत्र वाहती। जल प्रलय ओढवला ॥३९॥
शिवाने सैन्य बुडता पाहिले। वेगी मारुतास्त्र सोडिले।
तेणे पर्जन्यास निवारिले। प्रलय नाहीसा झाला ॥४०॥
मारुतास्त्रे जल शोषिले। ते आकाशी समुद्रे राहिले।
दैत्य सैन्य उठवोनी नेले। नभात कापसापरी ॥४१॥
ते वेळी मल्लासुर कोपला। दारूण सर्पास्त्र सोडिता झाला॥
सर्वत्र सर्प दिसू लागले। भैरव सैन्यासही ॥४२॥
सर्व फडा दंश करिती। विष सर्वत्र गाळिती।
उडोनी जिव्हारी झोंबती। रणभूमीवरी सर्वत्र ॥४३॥
मार्तंड भैरव आवेशला। गरुडास्त्र सोडिता झाला।
गरुड भये सर्पे कंप सुटला। गेले पाताळी सर्प सारे ॥४४॥
शंभु काय करिता झाला। पाशुपतास्त्रे त्रिशूल मंत्रीला।
मल्लासुराते मारिता जाहला। अति क्रोधे करोनिया ॥४५॥
दैत्य गदा मुसळे मारीत। शरे मुसळ्याते निवारीत।
चक्र नांगर फेकीत। परी तो त्रिशूळ येतसे ॥४६॥
त्रिशुले सर्व शस्त्रे झाकीला। दैत्याच्या जवळी आला।
मल्लाच्या वक्षस्थळी आदळला। कालदंड जणू काय ॥४७॥
दैत्य हाहाकार करिती। रणभूमी सोडुनी पळत।



Scanned by CamScanner

मल्लासुराचे डोळे भिरभिरती। पडला दैत्य रणभूमीसी ।।४८।।

शंभु उवाच: ।।४९ ।।

अहो दैत्यराजा उठशी। का न युद्ध करीसी।
तू तर थोर युद्धा असती। का पडला रणभूमीसी ।।५० ।।
मार्तंडभैरवे चरण उचलिला। मल्लाच्या मस्तकी ठेवीला।
चरणस्पर्शे दैत्य निर्मळ झाला। शत्रुत्व विसरला शंभूसी ।।५१ ।।
दैत्य चरण मस्तकी धरुन। लोचने आनंद जळे भरुन।
उत्कंठा भक्ती करुन। स्तविता झाला शिवशंकर ।।५२ ।।
मार्तंड भैरवाचे चरण। जे दुस्तर व्यथाहरण।
सदा ध्यावे आपण। जो स्वामीचा सेवेकरी ।।५३ ।।

इति श्री गुरुमाऊली विरचित, प्राकृत भावार्थ टीका
ब्रह्मांड पुराणे, क्षेत्रखंडे मल्हारी सप्तशती एकादशोध्याय
श्री कुलदैवत खंडेराव महाराज चरणार्पणमस्तु ।।११ ।।
।। ओवी ४३० ।।

## ।।अध्याय बारावा।।

श्रीगणेशाय नम:

श्री गुरुमाऊली उवाच: ।।१ ।।

मार्तड भैरवाचे चरण मस्तकी पडता। विसरला तो मल्लासूर वैरता।
क्षण एक संतसंगती घडता। दैत्य तोही देव बने ।।२ ।।
शिवचरणांची महती। सांगितली श्रीगुरुचरित्री।
शिव तेच समर्थ असती। स्वामी सेवेकऱ्यांचे सद्गुरु ।।३ ।।



Scanned by CamScanner

सनत्कुमार उवाचः ॥४॥

सांगतो ऋषी हो तुम्हासी। जीव शेष उरला मल्लासी।
मग करिता झाला स्तोत्रासी। मार्तंडभैरव शंभूचे ॥५॥

मल्लासूर उवाचः ॥६॥

विनवितो मी भैरव तुजसी। उद्धरी मज पापकर्मासी।
पापात्मा पापकर्मासी। देवा मज पवित्र करी ॥७॥
देवा मी उन्मत्त जाहलो। त्रिभुवनाते पीडो लागलो।
त्या कर्मे प्रापसागरी बुडालो। शंकरा उद्धरी मज ॥८॥
मी विनवितो शिवशंकरासी। जीव नसे स्वतंत्र कर्मासी।
तूच सूत्रधार होसी। शुभ-अशुभ कर्मफळाते ॥९॥
तू जगाचा सूत्रधार होसी। तू विश्वाचे पालन करिसी।
चराचरा व्यापून उरलासी। शंभू तूच देवराया ॥१०॥
काय दैत्य वेगळे असती। हे तू जाणसी गिरिजापती।
तुच जगाचा अधिपती। तूज नमन कैलासपती ॥११॥
नमो देवा महादेवा। शिवासी नित्य वंदन।
नित्य वंदन रौद्र रूपासी। गौरीपती तूज शंभूसी ॥१२॥
नमो जगतकर्ता शिवासी। नमो कल्याणकारी महादेवासी।
चंद्र धरी मस्तकासी। नीलकंठाय नमो नमः ॥१३॥
जो देव सकला मध्ये। चेतना रूपे असे स्थित।
नमो देवा ॥१४॥ नमो देवा ॥१५॥नमो देवा नमो नमः ॥१६॥
जो देव सकला मध्ये बुध्दि रूप असे स्थित ।नमो देवा ॥१७॥
नमो देवा ॥१८॥ नमो देवा नमो नमः ॥१९॥



Scanned by CamScanner

जो देव सकला मध्ये क्षमारूपे असे स्थित।नमो देवा ।।२०।।
नमो देवा ।।२१।। नमो देवा नमो नमः ।।२२।।
जो देव सकलामध्ये मोहरूपे असे स्थित।
नमो देवा ।।२३।। नमो देवा ।।२४।।
नमो देवा नमो नमः ।।२५।।
जो देव सकलामध्ये कामरूपे असे स्थित। नमो देवा ।।२६।।
नमो देवा ।।२७।। नमो देवा नमो नमः ।।२८।।
जो देव सकलामध्ये भ्रमरूपे असे स्थित।नमो देवा ।।२९।।
नमो देवा ।।३०।। नमो देवा नमो नमः ।।३१।।
जो देव सकलामध्ये धर्मरूपे असे स्थित।नमो देवा ।।३२।।
नमो देवा।।३३ ।। नमो देवा नमो नमः ।।३४।।
जो देव सकलामध्ये हर्षरूपे असे स्थित। नमो देवा ।।३५।।
नमो देवा ।।३६ ।। नमो देवा नमो नमः ।।३७।।
जो देव सकलामध्ये क्रोधरूपे असे स्थित।नमो देवा ।।३८।।
नमो देवा ।।३९ ।। नमो देवा नमो नमः ।।४०।।
जो देव सकलामध्ये मद रूपे असे स्थित।नमो देवा ।।४१।।
नमो देवा ।।४२ ।। नमो देवा नमो नमः ।।४३ ।।
जो देव सकलामध्ये दंभ रूपे असे स्थित।नमो देवा ।।४४।।
नमो देवा ।।४५।। नमो देवा नमो नमः ।।४६।।
जो देव सकलामध्ये अंहकार रूपे असे स्थित। नमो देवा ।।४७।।
नमो देवा ।।४८।। नमो देवा नमो नमः ।।४९।।
जो देव सकला मध्ये वीर रूपे असे स्थित। नमो देवा ।।५०।।



Scanned by CamScanner

नमो देवा ।।५१ ।। नमो देवा नमो नमः ।।५२।।
जो देव सकलामध्ये क्रिया रूपे असे स्थित। नमो देवा ।।५३।।
नमो देवा ।।५४।। नमो देवा नमो नमः ।।५५।।
जो देव सकलामध्ये शक्तिरूपे असे स्थित।नमो देवा ।।५६।।
नमो देवा ।।५७।। नमो देवा नमो नमः ।।५८।।
जो देव सकलामध्ये शौर्य रूपे असे स्थित।नमो देवा ।।५९ ।।
नमो देवा ।।६० ।। नमो देवा नमो नमः ।।६१ ।।
जो देव सकलामध्ये विद्यारूपे असे स्थित।नमो देवा ।।६२ ।।
नमो देवा ।।६३ ।। नमो देवा नमो नमः ।।६४।।
जो देव सकलांमध्ये ज्ञानरूपे असे स्थित। नमो देवा ।।६५।।
नमो देवा ।।६६।। नमो देवा नमो नमः ।।६७।।
जो देव सकलांमध्ये लोभरूपे असे स्थित । नमो देवा ।।६८ ।।
नमो देवा ।।६९।। नमो देवा नमो नमः।।७०।।
जो देव सकलामध्ये क्षुधारूपे असे स्थित।नमो देवा ।।७१।।
नमो देवा ।।७२।। नमो देवा नमो नमः ।।७३।।
जो देव सकलामध्ये निद्रारूपे असे स्थित।नमो देवा ।।७४।।
नमो देवा ।।७५।। नमो देवा नमो नमः ।।७६।।
जो देव सकलामध्ये भक्तीरूपे असे स्थित।नमो देवा।।७७।।
नमो देवा ।।७८ ।। नमो देवा नमो नमः ।।७९।।
जो देव सकलामध्ये मृत्युरूपे असे स्थित। नमो देवा ।।८०।।
नमो देवा ।।८१ ।। नमो देवा नमो नमः ।।८२।।
जो देव सकलामध्ये आत्मारूपे असे स्थित। नमो देवा ।।८३ ।।



Scanned by CamScanner

नमो देवा ।।८४।। नमो देवा नमो नमः ।।८५ ।।
नमो प्रपंचरूपाय ।।८६।। नमो प्रपंचरहिताय नमो नमः।।८७।।
नमो विष्णूरूपाय।।८८।।नमो शिवरूपाय नमो नमः।।८९।।
नमो सूक्ष्मरूपाय।।९०।। नमो भव्यरूपाय नमो नमः ।।९१।।
नमो त्रैलोक्यनाथाय।।९२।। नमो भैरवाय नमो नमः।।९३।।
नमो भक्तवत्सलाय।।९४।।नमो भक्ततारकाय नमो नमः ।।९५।।
नमो जगसंहारकर्ताय।।९६।।नमो जगपालनकर्ताय नमो नमः ।।९७।। नमो चंद्रशेखराय।।९८।। नमो त्रिपूरछेदकाय नमो नमः ।।९९।। नमो मणिखंडणाय।।१००।। नमो मार्तंड भैरवाय नमो नमः ।।१०१।। ऐसी मल्लाची स्तुती ऐकोनी। प्रसन्न झाला शूलपाणी।।१०२।।

शिव उवाचः ।।१०३ ।।

मल्ला मी झालो प्रसन्न तुजसी। माग आता उत्तम वरासी ।।१०४।।

मल्लासूर उवाचः ।।१०५ ।।

नमितो मी मार्तंडभैरवासी। तू प्रसन्न असता आम्हासी।
परलोकाची चिंता कायसी। तुझे दर्शन झालियावरी ।।१०६।।
देवा महान प्रताप करुन। तुझा दास जाहलो जाण।
उत्तम सुख भोगावे आपण। जे दुर्लभ इंद्रादी देवांना ।।१०७।।
योद्धा तुजसारखा मिळाला। समरंगणी मृत्यू पावला।
कीर्ति माझी भूमंडळा। आता काय मागे स्वामी ।।१०८।।
मी मागेन ते द्यावे। तुझ्या नामाआधी माझे नाम असावे।
शरीर तुझ्या चरणी असावे। निरंतर स्वामी शंकरा ।।१०९।।



Scanned by CamScanner

मी केलेल्या या स्तोत्राशी। पठण करील त्या नरासी।
सकळ सिद्धी द्याव्या तयासी। इतके करावे स्वामीया।।११०।।
जे तुझी भक्ती करिती। त्यांसी प्रसन्न व्हावे भवानीपती।
त्याचिया मनोरथाची आर्ती। शीघ्र पुरविजे देवराया ।।१११।।
लक्ष्मी वसती तयांच्या घरी। रोग नसावे त्याच्या शरीरी।
न्यावे त्यासी मोक्षदारी। स्वामी शिवशंकरा ।।११२।।
भक्तीने भावे करुन। तुझे करती जे पूजन।
त्यासी निरंतर व्हावे प्रसन्न। सुलभ होऊनी स्वामीया ।।११३।।

शिव उवाचः।।११४।।

झालो मी तुज प्रसन्न। मागितले तू जे वरदान।
ते देईन मी तूज। मल्लासूर तू दैत्यश्रेष्ठ ।।११५।।

सनत्कुमार उवाचः।।११६।।

रणी पडलिया मल्लाचे। पाच पुत्र आले युद्धासी।
नावे तयाचे परियेसी। सांगतो ऋषिवर तुम्हासी ।।११७।।
लोहार्गला शूलधर। देव गंधर्व कुंभवीर।
पाचवा महाबाहो असूर। हे पुत्र मल्लासुराशी ।।११८।।
ते मल्लाचे पुत्र म्हणोनी। उपेक्षिता झाला शूलपाणी।
न राहती दर्पे करोनी। धावले ते महादेवावरी ।।११९।।
भैरव आवेशला मणी। शाप दिला मूर्खांलागोनी।
तुम्ही रहावे पर्वत होऊनी। या भूमंडळावरी ।।१२०।।
ऐसी मल्हारीची स्तुती। वाचती जे श्रोती।
ते सकळ सुख पावती। सांगतसे गुरुमाऊली ।।१२१।।



Scanned by CamScanner

इति श्री गुरुमाऊली विरचित, प्राकृत भावार्थ टीका
ब्रह्मांड पुराणे, क्षेत्रखंडे मल्हारी सप्तशती द्वादशोध्याय
श्री कुलदैवत खंडेराव महाराज चरणार्पणमस्तु ।।१२।।

।। ओवी ५५१।।

## ।।अध्याय तेरावा।।

श्री गणेशाय नमः

शिव उवाचः ।।१।।

धर्मसुतांनो तुमचा वैरी महादैत्य। मल्लासूर महाउन्मत्त।
तो मी मारला सेनेसहीत। या पवित्र रणभूमीत ।।२।।
तुम्ही सुखे असावे। आश्रमी अनुष्ठान करावे।
आपुल्या इच्छेप्रमाणे रहावे। या भूमंडळी कोठेही ।।३।।
शिवाचे वचन ऐकोन। संतोषले धर्मसुतांचे मन।
मागते झाले वरदान। शिव मार्तंडभैरवासी ।।४।।

धर्मसूत उवाचः ।।५ ।।

महेश्वरा तुज नमन। मार्तंडभैरव तुज नमन।
तू आमुचे करुनी रक्षण। कृपावंत झाला आम्हावरी ।।६।।
त्रिलोकांच्या सर्व बाधा। सर्वेश्वरा तुम्ही दूर करा।
आमुचे वैरी मारा। नाश तयाचा करा सदा ।।७।।
येथे तू जे युद्ध केले। मणी-मल्लासुरास वधिले।
आम्हासी दुःखमुक्त केले। मार्तंडभैरवा चंद्रशेखरा ।।८।।
कळीकाळ दोषे पीडिले। संसारसागरी बुडाले।

दारिद्र्य दु:खे गांजिले। तयासी सुखी करावे ॥९॥
आता आम्हावरी कृपा करणे। येथे तू प्रगट होणे।
स्वयंभु स्वरूपात राहणे। भक्ताच्या कल्याणासाठी ॥१०॥
धर्मसुताची ऐकोनी विनवणी। सदाशिव अंगीकारी तत्क्षणी।
शक्तीसहीत लिंगद्वय होऊन। प्रगटला कल्पवृक्षाखाली ॥११॥
शुक्ल पक्षी मार्गशीर्ष मासी। षष्ठी तिथी आदित्य वारी।
शततारका दिवस नक्षत्री। लिंगे प्रगट झाली दोन्ही ॥१२॥
सुदिनी देव आले यात्रेसी। कलत्र-पुत्र परिवारासी।
ऋषी आले कुटुंबेसी। त्या लिंगाजवळी ॥१३॥
ते मणी खंडे अधिष्ठिली। मोठ्या उत्सव केली।
ती थोर राजधानी झाली। प्रेमपुरी नाम पावली ॥१४॥
अशी ही प्रेमपुरी। कलियुगे होईल जेजुरी।
तेथे वसतसे देव मल्हारी। भक्ताच्या रक्षणासाठी ॥१५॥
ऋषी, देवगण एकत्र येती। जैसे मार्तंडभैरवासी पाहती।
तैसी मूर्ति घडविती। सकल जनासाठी ॥१६॥
म कार नामे भू बोलीजे। र कार नामे विष्णू म्हणिजे।
इला नामे पृथ्वी सांगिजे। नामे बोलावे मैराळ ॥१७॥
त्या मैराळ देवासी। पूजिते झाले देव, ऋषी।
करिते झाले नमस्कारासी। नाना पुष्पे वाहोनी ॥१८॥
धूप दीप दाविती। नाना फळे समर्पिती।
अनेक नैवेद्यपात्रे करिती। त्या मैराळ देवतेसी ॥१९॥
कर्पूरे चंदने लाविती। हरिद्रा भंडार वाहती।



Scanned by CamScanner

नाना वाद्ये वाजविती। गीतनृत्य तेही करिती ||२०||
देवासी दवणा वाहती। तांदूळ पिवळे समर्पिती।
पिवळे वस्त्रे देती। ऋषिगण तयेवेळी ||२१||
मोरपिसांची चामरे ढाळती। षोडशोपचारे पूजिती।
नाना आरती करिती। स्तुती करती मल्हारीची ||२२||

देव उवाचः ||२३ ||

जयजयाजी देवा खड्गधरा। जगन्नाथा चंद्रशेखरा।
जय गंगा-मस्तकी-धरा। विश्वपालका महादेवा ||२४||
जयजयाजी मल्लसैन्यमर्दना। जय जयाजी महादैत्यविभंजना।
जयजय करी पात्रापूर्णा। जयजय शिवशंकरा ||२५||
जयजयाजी मल्लमर्दना। जयजयाजी मणिसुदना।
जयजय दैत्य प्रेतासना। जयजयाजी मार्तंड भैरवा ||२६||
जयजयाजी त्रिपूरदाहका। जयजयाजी असुरांतका।
जयजय प्रतापकारिका। त्रिशूळधारी शंभू जयजया ||२७||
नमो दैत्य विघ्नांतकासी। कलि दोषहरा भक्तप्रियासी।
नमो करुणासागरासी। संहारकारका मार्तंडभैरवासी ||२८||
नमो वैराल देवा मल्लासी। नमू विश्वाच्या पालकासी।
नमो देवा आर्चित चरणासी। वागीश्वरा नमन तुज ||२९||
नमो शिवाय। नमो महेश्वराय।
नमो शंभवेय। पिनाकिने नमन तुज ||३०||
नमो शशिशेखराय। नमो वामदेवाय।
नमो विरुपाक्षाय। कपर्दिने नमन तुज ||३१||

नमो नीललोहिताय। नमो शिवशंकराय।
नमो शूलपाणाय। खटवांगीने नमन तुज ।।३२।।
नमो विष्णूवल्लभाय। नमो शिपीविष्टाय।
नमो अंबिकानाथाय। श्रीनीलकंठाय नमन तुज ।।३३।।
नमो भक्तवत्सलाय। नमो भवाय।
नमो शर्वाय। त्रिलोकेशाय नमन तुज ।।३४।।
नमो शितिकंठाय। नमो शिवप्रियाय।
नमो उग्राय। सर्वेश्वराय नमन तुज ।।३५।।
नमो कामारायाय। नमो अंधकासूरसुदनाय।
नमो गंगाधराय। ललाटाक्षाय नमन तुज ।।३६।।
नमो कालकाळाय। नमो कृपानिधयाये।
नमो भीमाय। परशुहस्ताय नमन तुज ।।३७।।
नमो मृगपाणयाय। नमो जटाधराय।
नमो कैलासनिवासाय। कवचीने नमन तुज ।।३८।।
नमो कठोराय। नमो त्रिपुरान्तकाय।
नमो वृषांकाय। वृषभारुढाय नमन तुज ।।३९।।
नमो भस्मोद्धलित विग्रहाय। नमो सामप्रियाय।
नमो स्वरमयाय। त्रिमूर्तये नमन तुज ।।४०।।
नमो अनिश्वराय। नमो सर्वज्ञाय।
नमो परमात्मनाय। सोमसूर्याग्निलोचनाय नमन तुज ।।४१।।
नमो हविषेयाय। नमो यज्ञमयाय।
नमो सोमाय। पंचवक्त्राय नमन तुज ।।४२।।



Scanned by CamScanner

नमो सदाशिवाय। नमो विश्वेश्वराय।
नमो वीरभद्राय। गणनाथाय नमन तुज ॥४३॥
नमो प्रजापतयाय। नमो हिरण्यरेतसाय।
नमो दुर्धर्षाय। गिरीशाय नमन तुज ॥४४॥
नमो भालचंद्राय। नमो अनघाय।
नमो भुजंग भूषणाय। भर्गाय नमन तुज ॥४५॥
नमो गिरीधनायाय। नमो गिरीप्रियाय।
नमो कृतिवाससाय। पुरारातये नमन तुज ॥४६॥
नमो भगवंताय। नमो प्रमथाधिनाथाय।
नमो मृत्युंजयाय। सुक्षम तनये नमन तुज ॥४७॥
नमो जगद्व्यापिनाय। नमो जगद्गुरुवेयाय।
नमो व्योमकेशाय। महासेनजनकाय नमन तुज ॥४८॥
नमो चारुविक्रमाय। नमो रुद्राय।
नमो भूतपतयाय। स्थाणवे नमन तुज ॥४९॥
नमो अहिर्बुध्न्याय। नमो दिगंबराय।
नमो अष्टमूर्तयेयाय। अनेकात्मने नमन तुज ॥५०॥
नमो सात्त्विकाय। नमो शुद्ध विग्रयाय।
नमो शाश्वताय। खंडपरशवे नमन तुज ॥५१॥
नमो अजाय। नमो पाशविमोचनाय।
नमो मृडाय। नमो पशुपतये नमन तुज ॥५२॥
नमो देवाय। नमो महादेवाय।
नमो अव्ययाय। हराय नमन तुज ॥५३॥



Scanned by CamScanner

नमो भगनेत्रभिदाय। नमो अव्यक्ताय।
नमो सहस्राक्षाय। नमो सहस्रपदे नमन तुज ।।५४।।
नमो अपवर्गप्रदाय। नमो अनंताय।
नमो तारकाय। परमेश्वराय नमन तुज ।।५५।।
देव, ऋषींची स्तुती ऐकोनी। आली चेतना मूर्ति लागुनी।
उभा प्रत्यक्ष प्रसन्न होऊनी। देव मल्हारी तयापुढे ।।५६।।

देव मल्हारी उवाच: ।।५७।।

मी प्रसन्न जाहलो तुम्हासी। मागावे तुम्ही उत्तम वरासी ।।५८।।

ऋषि उवाच: ।।५९।।

देवा तुम्ही प्रसन्न जाहले। तुवा विश्वाचे साकडे फेडले।
सैन्यसहीत मल्लासी मारिले। भार फेडीला वंसुधरेचा ।।६०।।
मल्हारी तुम्ही इतके करावे। सर्वांचे कुलदैवत बनावे।
सकळ कुळाते सांभाळावे। निरंतर येथे राहुनिया ।।६१।।
भक्ताच्या घरी लक्ष्मी वसावी। संपत्ती बहुत व्हावी।
संतती तया प्राप्त व्हावी। सुख लाभावे तयासी ।।६२।।
तयांचे वैरी क्षय पावती। भूत पिशाच्य बाधू न शकती।
डाकिनी, राक्षसांची न भीती। ग्रहपीडा नसे तया ।।६३।।
जे पढती मल्हारी सप्तशती। तया न कशाची भीती।
स्वामी समर्थांची लाभे प्रीती। सकळ सेवेकऱ्यांना ।।६४।।

मल्हारी उवाच: ।।६५।।

देव, ऋषी हो ऐकिले वचनासी। माझा आशीर्वाद तुम्हासी।
तुम्ही मागितले ज्या वरासी। तो प्राप्त होवो तुम्हासी ।।६६।।



Scanned by CamScanner

मी तेथे निवास करितो। भक्तास सदैव साथ देतो।
निर्भय तयास करितो। कल्याण तयाचे होवो ॥६७॥
ही माझी जेजुरी। मी राहतो गडावरी।
प्रेम माझे भक्तावरी। भावभक्तीने सेवा जे करिती ॥६८॥
अशी ही युद्धकथा। सांगितली स्वामींच्या भक्ता।
श्री स्वामीच वदविता। श्री गुरुमाऊलीच्या मुखे ॥६९॥
इति मल्हारी सप्तशती। श्रोते सदा परिसती।
तया देव पावती। विनवी स्वामी सेवेकरी ॥७०॥

इति श्री गुरुमाऊली विरचित, प्राकृत भावार्थ टीका
ब्रह्मांड पुराणे, क्षेत्रखंडे मल्हारी सप्तशती त्रयोदशोध्याय
श्रीकुलदैवत खंडेराव महाराज चरणार्पणमस्तु ॥१३॥
॥ओवी ६२१॥

## ॥अध्याय चौदावा॥

श्री गणेशाय नमः

गुरुमाऊली उवाचः ॥१॥

अशी मल्हारीची कथा। निवारील सर्व व्यथा।
ब्रह्मांड पुराणात असे। सांगितली सर्व सेवेकऱ्यासाठी ॥२॥
खंडेराव सर्वांचे दैवत। कुळांचे ते कुलदैवत।
तयाशी नित्य पूजित। सर्वार्थ प्राप्त होत ॥३॥

सेवेकरी उवाचः ॥४॥

मल्हारी मार्तंडभैरवास। खंडेराव का म्हणता तयास।

म्हाळसाकान्त असे नावास। कसे प्राप्त जाहले ।।५।।

श्री गुरुमाऊली उवाच: ।।६।।

खड्गधारी म्हणोनी खंडोबा म्हणती। म्हाळसेचा तो पती।
म्हणुनी तो म्हाळसापती। जाणावा सर्वांनी ।।७।।
देव मल्हारीस दोन पत्नी। म्हाळसा, बाणाई त्या।
ऐकावी म्हाळसाईची कथा। तुम्ही सर्व सेवेकरी ।।८।।
देव-दानव युद्धात। अमृत निघाले समुद्रमंथनात।
दोघांनाही रस अमृतात। तयाचे वाटप कसे करावे ।।९।।
श्रीविष्णूची मोहिनी अवतरली। दानवसेना सौंदर्याने वेडी झाली।
देवांना अमृताची गोडी मिळाली। दानव मोहिनीमागे राहिली ।।१०।।
शिवशंकर रूपे भाळले। मोहिनीच्या मागे धावले।
अतिकामविव्हळ झाले। मोहिनी पार्वती झाली ।।११।।
पार्वती मोहिनी होऊनी। शंकरास झाली आश्वासुनी।
तुम्ही मल्हारी अवतार धरुनी। याल तेव्हा पत्नी होईल ।।१२।।
तिम्माशेट वाणी नेवासास। संतान नव्हते तयास।
सदा पूजितसे शिवास। म्हाळसा जन्मली तयांच्या घरात ।।१३।।
यथाकाळ उपवर झाली। शेठजींना लग्नाची काळजी लागली।
स्वप्नात शिववाणी ऐकली। म्हाळसेचा विवाह खंडेरायासी ।।१४।।
पौष मासातील पौर्णिमेला। पाली नावाच्या गावाला।
खंडेराय-म्हाळसा विवाह झाला। शिव-शक्ती एकत्र झाले ।।१५।।
दुसरी कथा बाणाईची। ती सातवी कन्या इंद्राची।
झाली पत्नी मल्हारीची। ती तुम्हा सांगतो ।।१६।।

इंद्राला कन्या सात। इंद्रदेव तयासी पुसतात।
तुमचा भाग्यविधाता कोण। सांगावे तुम्ही मजसी ॥१७॥
सहा कन्या सांगतात। तुम्हीच भाग्यविधाते तात।
सातवी वेगळी सांगत। ती मात्र आगळी ॥१८॥
माझे भाग्य विधिलिखित। जसे असेल भाग्यात।
तसेच घडेल जीवनात। इंद्राला राग आला ॥१९॥
तयांने तिला बालक केले। एका पेटीत बंद केले।
चंदनापुरीच्या रानात टाकले। म्हणे तुझे भाग्य कसे ॥२०॥
पेटी सापडली धनगराला। पाहुनी तयातील बालिकेला।
थोर आनंद जाहला। पोटच्या मुलीप्रमाणे ठेविले ॥२१॥
तिचे नाव बानू ठेविले। तिने शंकरांचे पूजन केले।
शिवशंकर प्रसन्न झाले। तिला जेजुरीस बोलावले ॥२२॥
जेजुरीस खंडेरायाच्या महालात। बैसले दोघे म्हाळसाकान्त।
बाणू मल्हारीवर झाली मोहित। म्हणे हाच माझा पती ॥२३॥
खंडेरायही भाळले तिच्यावरी। भुलले तिच्या लावण्यावरी।
ध्यास बाणूचा अंतरी। सर्वत्र बाणूच दिसे ॥२४॥
म्हाळसेला म्हणे सारीपाट खेळावा। हरणाऱ्याने वनवास भोगावा। असा करार ठरवावा। खेळात खंडेराय हरले ॥२५॥
खंडोबा वनवासास निघाले। धनगराचे रूप घेते झाले।
बाणूच्या घरी राहिले। सातशे मेंढ्या सांभाळायला ॥२६॥
खंडोबाने नदीवर मेंढ्या नेल्या। तेथे त्या सर्व मारिल्या।
धनगर वाडा जमा झाला। खंडोबास दोष दिला ॥२७॥

मेंढ्या जिवंत होतील। जर बाणू लग्न करील।
माझी पत्नी होईल। असे सांगे खंडेराव ।।२८।।
माझा पती मल्हारी। बाणू जाणार नाही धनगरा घरी।
खंडोबा तिचा हात धरी। तेव्हा दिसे मल्हारी ।।२९।।
बसवूनी तिला घोड्यावरी। आले नळदूर्ग गडावरी।
तेथे विवाह करोनी। आले जेजुरी नगरी ।।३०।।
खंडेरायसह बाणाईस। पाहताच ती सवतीस।
राग आला म्हाळसाईस। ती महालात निघून गेली ।।३१।।
मल्हारी सांगे समजावून। पार्वतीची दासी जयाद्री म्हणुन।
तीच आली बाणाई बनून। तुझ्या आशीर्वादाने ।।३२।।
गंगा-पार्वती सवती मत्सरात। जयाद्री साक्षी असत।
त्या तिला शब्द देत। पुढे अर्धी भार्या होशील ।।३३।।
तिलोत्तमा नामे लावण्यवती। सुंदर अप्सरा होती।
इंद्रशापे मुरलीरूपे ती। कृष्णा हाती शोभली ।।३४।।
पुढे बाणाईच्या शापाने। नाचु लागली मुरळी रूपाने।
तीच प्रथा कालांतराने। जेजुरीस रूढ झाली ।।३५।।
नळदूर्गाच्या चंदन वृक्षाखाली। वाघ्ये आले धनगराजवळी।
तयांनी मेंढीची मागणी केली। तेव्हा चमत्कार जाहला ।।३६।।
खंडोबाने स्वत: त्यांचेवर। फुंकिला आपला भंडार।
तोच झाला त्यांचा उद्धार। मानवरूपी वाघे झाले ।।३७।।

गुरुमाऊली उवाच: ।।३८।।

देव भंडाराची कथा ऐकावी। भंडार म्हणजे हळद जाणावी।



Scanned by CamScanner

ही योगमायेची उत्पत्ती जाणावी। असे ब्रह्मलिखित ।।३९।।
योगनिद्रा श्रीहरीची। असे कथा सप्तशतीची।
मणी-मल्लासूर राक्षसांची। भीतीने योगनिद्रा गुप्त झाली ।।४०।।
ब्रह्मा-विष्णु-महेश। झाले वृक्ष वड, पिंपळ, पळस।
त्रिपूरसुंदरीच्या बसले जपास। शोधावया योगनिद्रेस ।।४१।।
झाली मंत्राची लक्ष आवर्तने। आले त्रिपूरसुंदरीस प्रगट होणे।
पिवळे कोंब फुटले। आसनाखाली तिघांच्या ।।४२।।
त्रिपुरा सांगे तयासी। घ्यावे या हळदीसी।
ओळखावे योगनिद्रेसी। हीच तीच तुमची माया ।।४३।।
हळदीचे पिवळे चूर्ण। अनेक रोगांचे करील निवारण।
जणू हे असे सुवर्ण। लावावे तुम्ही सर्वांगे ।।४४।।
शिवाच्या मल्हारी अवतारी। हरिद्रा उधळावी तयावरी।
कृपा करेल भक्तावरी। हा देव मल्हारी ।।४५।।
पूर्वी एकदा बाळकृष्णाने। मार्तंडाचा नैवेद्य फेकला रागाने।
तेव्हा त्याला यशोदेने। उखळीस बांधून ठेविला ।।४६।।
नैवेद्य फेकला म्हणुन। खंडोबा झाला कोपायमान।
त्याच्या शापाने तो कृष्ण। श्वानरूप जाहला ।।४७।।
नारदाने करुनी प्रयत्न। भंडारा मिळविला वाघ्याकडून।
तो फेकता श्वानावरून। कुत्र्याचा कृष्ण जाहला ।।४८।।
तुम्ही रक्षाल देवास। तर देव रक्षेल तुम्हास।
सांगतो मी सेवेकऱ्यास। कथा तयाची ऐकावी ।।४९।।
एकदा यवनी सैन्य हल्लेखोर। आले चाल करुनी गडावर।



Scanned by CamScanner

तेव्हा तेथील रखवालदार। असे शूर सरदार ॥५०॥
यवन सैन्य धावले। गडाचा तट फोडू लागले।
गडावरील सैन्य झेपावले। सैन्यास बेजार केले ॥५१॥
तेव्हा खंडोबाने काय केले। एक छोटे छिद्र निर्माण केले।
त्यातुन लाखो भुंगे निघाले। यवनी सेनेला तयांनी पिटाळले॥५२॥
शत्रुसेना पळू लागली। तयाची खोड मोडली।
गडगडत गडाखाली गेले। जाज्वल्य मार्तंडभैरवाने ॥५३॥
ऐसा तो देव खंडोबा। यवन करी तोबा तोबा।
त्या पवित्र गडाचा ताबा। त्यांना घेता न आला ॥५४॥
बादशहा स्वतः आला। मल्लूखान म्हणे खंडोबाला।
सव्वालक्षाचा भुंगा वाहिला। त्याने जेजुरी गडावर ॥५५॥
सर्व सेवेकऱ्यांच्या घरात। खंडोबाचा टाक असावा देवघरात।
असे तो कुलदैवत। अठरापगड जातीचा ॥५६॥
चांदीचा टाक घडवावा। अश्वासह खंडोबा असावा।
मागे म्हाळसा असावी। घोड्याखाली कुत्रा ॥५७॥
घरातील विवाहाच्या वेळेस। घडवावे नवीन टाकास।
न्यावे त्यास देवभेटीस। जेजुरी गडावरी ॥५८॥
विवाह ठरता घरात। पूजावे खंडेरायास अंगणात।
रात्री जागरण गोंधळ करतात। विवाहाचे आमंत्रण देवास॥५९॥
ज्ञानदेव ज्ञानेश्वरी सांगितली। सच्चिदानंदाने ती लिहिली।
तसेच श्री गुरुमाऊली वदली। लिहितसे सेवेकरी ॥६०॥



Scanned by CamScanner

सेवेकरी उवाच: ||६१||

देवीचे जसे नवरात्र। तसे खंडेरायाचे कोणते व्रत ||६२||

गुरुमाऊली उवाच: ||६३ ||

देवीचे जसे नवरात्र। तसे खंडोबाचे षडरात्र।
मार्गशीष महिन्यात। करावे घरोघरी ||६४||
कुडाची पाटी घेऊन। त्यात माती भरुन।
धान्य त्यात पेरुन। ठेवावा कलश त्यावरी ||६५||
कलशात पाच पाने। त्यात पाणी सुपारी नाणे।
ताम्हणात तांदूळ भरणे। त्यावरी खंडोबाचा टाक ठेवणे ||६६||
मार्गशीर्ष प्रतिपदेपासून। चंपाषष्ठीपर्यंत।
रोज एक माळ वाहून। अखंड दीप ठेवावा ||६७||
कर्त्यापुरुषाने उपवास करावा। हा सप्तशती पाठ वाचावा।
अकरावेळा पाच दिवसात। ही असे सेवा खंडोबाची ||६८||
चंपाषष्ठीला कुळधर्म करावा। भरीत-भाकरीचा नैवेद्य दाखवावा।
दिवट्या-बुधल्यासहीत पूजावा। खंडेराय त्या दिवशी ||६९||
कुळधर्माच्या वेळी। नैवेद्य दाखविण्यापूर्वी।
भरावी घरात तळी। कर्त्यापुरुषासह सर्वांनी ||७०||
ताम्हणात तांदळाने अष्टदल काढुनी। भंडारा त्यात भरोनी।
तांब्यात सुपारी, पैसा ठेवुनी। खोबरेवाटी त्यात ठेवावी ||७१||
कलशाची पूजा करुन। पाच पुरुषांनी हात लावून।
ताम्हण वर उचलून। कपाळी आपल्या लावावे ||७२||

सदानंदाचा येळकोट। येळकोट येळकोट जय मल्हार।
असा जयजयकार करोनी। ताम्हण खाली घ्यावे ॥७३॥
असे तीनवेळा करुनी। खोबरेवाटी फोडुनी।
भंडार तयास लावुनी। जेजुरीकडे पाच पावले चालावे॥७४॥
भंडार उधळावा चौफेर। खोबरे फेकावे चहुदूर।
करावा मल्हारीचा जयजयकार। दिवट्या-बुधल्यासहीत ॥७५॥
घरात असता पुत्रचिंता। ही सप्तशती वाचता।
अकरा रविवार उपवास करता। चिंता मिटेल सर्वांची ॥७६॥
भक्ताची हाक ऐकुनी। धावतसे न लागता क्षण।
बिकट संकटे निवारण। करीतसे खंडेराया ॥७७॥
जय खंडेराया-म्हाळसादेवी। सदैव भक्ता सुखी ठेवी।
योगक्षेमाची चिंता नसावी। विजय व्हावा सर्वत्र ॥७८॥
खंडोबा स्मरावा अखंड अंतरी। श्वान एखादा येता दारी।
द्यावी त्यास भाकरी। अन्नदान अवश्य करावे ॥७९॥
विनवितो मी खंडेरायास। स्वामी समर्थांच्या सेवेकऱ्यांस।
समर्थ बनवावे तयास। समर्थांचा सेवेकरी समर्थच ॥८०॥

इति श्री गुरुमाऊली विरचित, प्राकृत भावार्थ टीकाया
ब्रह्मांड पुराणे, क्षेत्रखंडे मल्हारी सप्तशती चतुर्दशोध्याय
श्री कुलदैवत खंडेराव महाराज चरणार्पणमस्तू॥१४॥

॥ ओवी ७०० ॥



Scanned by CamScanner

येळकोट येळकोट जय मल्हार! श्री स्वामी समर्थ महाराज की जय, श्री गुरुदेव दत्त, श्री त्र्यंबकेश्वर महाराज की जय, गंगा-गोदावरी माता की जय, सद्‌गुरु परमपूज्य मोरेदादां की जय, श्री स्वामी समर्थ गुरुमाऊलीं की जय,
भारतमाता की जय !

## ॥ क्षमाप्रार्थना ॥

अपराध सहस्रो जे । होती हातून माझिया ॥
मानुनी दास माफी । मला तू शिवशंकरा ॥१॥
आवाहन न जाणे मी । न जाणे विसर्जन ॥
नेणे पूजन माफी दे । मला तू चंद्रशेखरा ॥२॥
मंत्रहीन क्रियाहीन । भक्तिहीन सुरेश्वरा ॥
मी पूजन जे केले । पावे साफल्य तव कृपे ॥३॥
शतापराधी जरी जो । मल्हारी नाम घेतसे ॥
सद्‌गती लाभते त्याला । ब्रह्मा जी देऊ न शके ॥४॥
मी अपराधी शरण । आलो मार्तंडभैरवा ॥
दयेचे पात्र आहो गे! । जशी इच्छा तसे करी ॥५॥
अज्ञान विस्मृति भ्रांती । न्यूनाधिक तया गुणे ॥
ते करी माफ हो देवा । प्रसन्न हो त्र्यंबकेश्वरा ॥६॥
येळकोट येळकोट । जय मल्हार ॥
माझी पूजा करी गोड । तुष्ट हो म्हाळसाकान्त ॥७॥
गुह्याहुनी अतिगुह्य । तू माझा जप ऐक हा ॥
मज लाभो सिद्धि तुझ्या । प्रसादाने खंडेराया ॥८॥
क्षमा प्रार्थना स्तोत्र । टीका प्राकृत भावार्थ ॥
श्री गुरुमाऊली विरचित ।श्री कुलदैवत चरणार्पणमस्तु ॥९॥
॥ श्री स्वामी चरणार्पणमस्तु ॥

Scanned by CamScanner